रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २९२
www.ramprahar.com

◆ सोमवार, ११ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

नेरळमध्ये थेट बोहल्यावरील बालविवाह रोखला!/२
राष्ट्रीय लोक अदालतीत ७०७८ प्रकरणे निकाली/५
टी-२० क्रिकेटमध्ये वैभव सूर्यवंशीचे षटकारांचे शतक/८

## पेट्रोलियम उत्पादनांचा वापर संयमाने करा -पंतप्रधान



**हैदराबाद :** पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या जागतिक तेल संकटानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना महत्त्वाचा संदेश दिला आहे. "आजच्या काळाची गरज ओळखून पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा वापर अत्यंत संयमाने करा," असे आवाहन त्यांनी रविवारी (दि.१०) केले. हैदराबाद येथे एका कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी तेलंगणामध्ये सुमारे ९,४०० कोटी रुपयांच्या विकासकामांचे उद्‌घाटन केले. यावेळी संबोधित करताना त्यांनी देशातील ऊर्जा सुरक्षेवर भाष्य केले. पंतप्रधान म्हणाले की, आपल्याला आयात केलेल्या पेट्रोलियम उत्पादनांचा वापर केवळ आवश्यक असेल तेव्हाच करायचा आहे. त्याचप्रमाणे पुढील एक वर्ष सोने खरेदी करू नका. यामुळे केवळ परकीय चलनच वाचणार नाही, तर युद्धाचा आपल्या अर्थव्यवस्थेवर होणारा विपरीत परिणामही कमी होईल.

# उलवे नोडमध्ये बुधवारी लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी अभीष्टचिंतन सत्कार आणि शाळा इमारतीचा उद्‌घाटन सोहळा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आदी मान्यवरांची लाभणार उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, सर्व समाजाचे प्रेरणास्थान, थोर दानशूर व्यक्तिमत्त्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन सत्कार तसेच दर्जेदार शिक्षण देणाऱ्या आणि नावलौकिक असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या इमारतीचा उद्‌घाटन सोहळा राज्याचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि. १३) सायंकाळी ६.३० वाजता उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर भव्य स्वरूपात होणार आहे. याबाबत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि. १०) येथे आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली.



पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या पत्रकार परिषदेला लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी वर्ष नियोजन समितीचे कार्याध्यक्ष व भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, रोजगार हमी फलोत्पादन व खार जमीन विकासमंत्री भरत गोगावले, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व रायगड लोकसभा खासदार सुनील तटकरे, मावळ लोकसभा खासदार श्रीरंग बारणे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आमदार दिलीप वळसे-पाटील, आमदार रविशेठ पाटील, आमदार डॉ. विश्वजित कदम, आमदार मंदा म्हात्रे, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार निरंजन डावखरे, आमदार विक्रांत पाटील, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी खासदार धैर्यशील पाटील, 'रयत'चे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षाची सुरुवात मागील वर्षी भव्य कीर्तन महोत्सवाने झाली. भजन महोत्सव, ७५ अभंग लोकार्पण, कबड्डी स्पर्धा, रक्तदान शिबिरे, नाट्य महोत्सव, रोजगार मेळावा, यूपीएससी-एमपीएससी प्रशिक्षण, सामूहिक बासरी वादन, नाट्य शिबिर, आगरी-कोळी महोत्सव, शिधावाटप असे अनेक उपक्रम वर्षभर सुरू राहिल्याचे आमदार ठाकूर यांनी नमूद केले. **(पान २ वर..)**



**उलवे नोड : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित अभीष्टचिंतन सत्कार आणि रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उद्‌घाटन सोहळ्याच्या नियोजन व तयारीची रविवारी स्वतः लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी पाहणी केली तसेच आवश्यक त्या सूचना केल्या. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेलचे महापौर नितीन पाटील, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, नगरसेवक हॅप्पी सिंग, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, सांस्कृतिक सेल जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, कामोठे शहर सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, चिन्मय समेळ आदी उपस्थित होते.**

## काँग्रेस परजीवी पक्ष, मित्रांच्याच पाठीत खंजीर खुपसतो!-पंतप्रधान मोदी



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

तमिळनाडूमध्ये टीव्हीके पक्षाने इतर पक्षांच्या मदतीने सत्ता स्थापन केली आहे. टीव्हीकेचे प्रमुख जोसेफ विजय यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली असून मंत्रिमंडळातील आठ जणांनीही यावेळी शपथ घेतली. या शपथविधीबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जोसेफ विजय यांचे अभिनंदन केले असून केंद्र सरकार राज्याच्या विकासासाठी कायम सहकार्य करेल, असे आश्वासन दिले. दरम्यान, यावेळी त्यांनी काँग्रेस धोकेबाज असल्याचे सांगत टीका केली. ते बंगळुरू येथे बोलत होते.

"सध्या तमिळनाडूतील परिस्थिती बघा. २५-३० वर्षे काँग्रेसचे द्रमुकसोबत घनिष्ठ संबंध होते. वेळोवेळी द्रमुकसोबतच्या युतीने काँग्रेसला संकटातून बाहेर काढले आहे. खरंतर २०१४ पूर्वी १० वर्षे काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकार मोठ्या प्रमाणावर द्रमुकमुळेच टिकले. तरीही जी द्रमुक काँग्रेसच्या भल्यासाठी सातत्याने काम करीत होती, त्याच पक्षाला राजकीय वारे बदलताच काँग्रेसने दगा दिला", याकडे पंतप्रधान मोदींनी लक्ष वेधले.

पंतप्रधान पुढे म्हणाले, सत्तेच्या लालसेपोटी सत्तालोभी काँग्रेसने पहिल्याच संधीत द्रमुकच्या पाठीत खंजीर खुपसला. आता राजकीयदृष्ट्या टिकून राहण्यासाठी काँग्रेसला आणखी एका पक्षाची गरज आहे, ज्याच्या पाठीवर स्वार होऊन ती पुढे जाऊ शकेल.

भाजप सरकारासाठी लोककल्याण सर्वोच्च आहे आणि त्यांचा मंत्र "सबका साथ, सबका विकास" हा आहे. भाजपचे मॉडेल हे सुशासनाचे मॉडेल आहे. त्यामुळे जनता विविध राज्यांमध्ये भाजपला दुसऱ्यांदा आणि तिसऱ्यांदा सेवा करण्याची संधी देत आहे, तर काँग्रेसची राज्य सरकारे पुन्हा सत्तेत येण्यात अपयशी ठरली आहेत, असेही पंतप्रधानांनी सांगितले.

## हिमंता बिस्वा सरमा पुन्हा होणार आसामचे मुख्यमंत्री; उद्या शपथविधी

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

आसामच्या राजकारणात पुन्हा एकदा हिमंता बिस्वा सरमा यांचे वर्चस्व कायम राहिले असून त्यांची भाजप विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी एकमताने निवड करण्यात आली आहे. यामुळे सरमा हे सलग दुसऱ्यांदा आसामचे मुख्यमंत्री बनणार आहेत. १२ मे रोजी गुवाहाटी येथे होणाऱ्या भव्य शपथविधी सोहळ्यात ते मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत.



गुवाहाटी येथे भाजप आणि एनडीए आमदारांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीसाठी केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा हे केंद्रीय निरीक्षक म्हणून उपस्थित होते. सरमा यांच्या नावाला भाजप तसेच मित्रपक्षांच्या आमदारांनी एकमताने पाठिंबा दिला. त्यामुळे कोणतीही मतभिन्नता न होता हिमंता बिस्वा सरमा यांची एकमताने विधिमंडळ पक्षनेते म्हणून निवड निश्चित झाली. बैठकीनंतर नड्डा यांनी सरमा यांच्या नावाची अधिकृत घोषणा केली.



**चेन्नई :** लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्स संघाचा युवा फलंदाज उर्विल पटेलने १३ चेंडूंमध्ये आयपीएलच्या इतिहासातील सर्वात वेगवान अर्धशतक झळकावले. यासह उर्विलने यशस्वी जैस्वालची बरोबरी केली आहे.

## तलावात बुडून चार जणांचा मृत्यू

**अमरावती : प्रतिनिधी**

पोहायला गेलेल्या दोन बहीण भावांसह चौघांचा तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. १०) अमरावतीच्या खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सुट्टीचा दिवस असल्याने जवळपास १५ मित्र-मैत्रिणी घातखेडा परिसरात स्वयंपाक व जेवण करण्याचा प्लॅन करून गेले होते. त्यानंतर त्यांनी रील्स शूट केल्या आणि फोटोही काढले. यावेळी एक जण पाय घसरून पाण्यात पडला. त्याला वाचवण्यासाठी इतरांचाही बुडून मृत्यू झाला.

सोनाली नरेंद्र जोशी (१६), आदित्य नरेंद्र जोशी (१२), पायल बबलू पंडित (२१) आणि यश गजानन काकणे (१३) अशी बुडून मृत्यू पावलेल्यांची नावे आहेत. परिसरातील ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.





स. न. वि. वि.

आपणांस कळविण्यात येते की, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल आणि लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य उद्‌घाटन सोहळा, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सवी सत्कार सोहळा बुधवार दि. १३ मे २०२६ रोजी संध्या. ६.३० वा. रामशेठ ठाकूर मैदान, प्लॉट क्र. ६, सेक्टर १२, उलवे नोड, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.

: उद्‌घाटक :

मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

: विशेष अतिथि :

मा.ना.श्री. नितीन गडकरी – केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री, भारत सरकार

मा. श्री. शरद पवार – खासदार, राज्यसभा, अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था,सातारा

मा. श्री. रविंद्र चव्हाण – प्रदेशाध्यक्ष, भाजपा महाराष्ट्र प्रदेश

: सत्कारमूर्ती :

मा. श्री. रामशेठ ठाकूर
माजी खासदार तथा चेअरमन, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

: प्रमुख पाहुणे :

मा. ना. श्री. गणेशजी नाईक – वनमंत्री, महाराष्ट्र राज्य
मा. ना. अदिती तटकरे – मंत्री, महिला व बाल विकास महाराष्ट्र शासन
मा. ना. श्री. भरतशेठ गोगावले – कॅबिनेट मंत्री रोजगार हमी फलोत्पादन व खार जमीन विकास महाराष्ट्र राज्य
मा. श्री. सुनील तटकरे – खासदार, रायगड लोकसभा, प्रदेशाध्यक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अ. प)
मा. श्री. श्रीरंग आप्पा बारणे – खासदार, मावळ लोकसभा
मा. श्री. दिलीप वळसे पाटील – आमदार व सदस्य मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा
मा. श्री. रविशेठ पाटील – आमदार, पेण विधानसभा
मा.डॉ. विश्वजीत कदम – आमदार व सदस्य मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था,सातारा
मा. सौ. मंदाताई म्हात्रे – आमदार, बेलापूर विधानसभा
मा. श्री. महेंद्र दळवी – आमदार, अलिबाग विधानसभा
मा. श्री. महेंद्र थोरवे – आमदार, कर्जत-खालापूर विधानसभा
मा. श्री. निरंजन डावखरे – आमदार, कोकण पदवीधर मतदारसंघ
मा. श्री. विक्रांत पाटील – आमदार, विधानपरिषद
मा. श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे – आमदार, कोकण विभाग शिक्षक
मा. श्री. धैर्यशील पाटील – माजी खासदार
मा. श्री. चंद्रकांत दळवी – चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा

तरी आपण सदर कार्यक्रमास अगत्याने उपस्थित राहावे, ही नम्र विनंती...!

: आपले स्नेहांकित :

आ. प्रशांत ठाकूर – कार्यकारी मंडळ सदस्य, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था
आ. महेश बालदी – अध्यक्ष, लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती
मा. श्री. जे. एम. म्हात्रे – मा. नगराध्यक्ष, कार्याध्यक्ष, लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती

# थेट बोहल्यावरील बालविवाह रोखला!



## नेरळ पोलिसांची धडक कारवाई

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात पुन्हा एकदा बालविवाहाचा धक्कादायक प्रकार समोर आला असून नेरळ पोलिसांच्या सतर्कतेमुळे दोन अल्पवयीन मुलांचे आयुष्य अक्षरशः उद्ध्वस्त होण्यापासून वाचले आहे. नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी राहुल वरोटे यांच्या कार्यतत्परतेमुळे सुरू असलेला बालविवाह थेट बोहल्यावर जाऊन रोखण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील उक्रुळ कातकरी वाडी येथील १७ वर्षीय अल्पवयीन मुलगा आणि खालापूर तालुक्यातील टेंभरी येथील १६ वर्षीय मुलगी यांचा विवाह मोठ्या थाटामाटात लावण्यात येत होता. बँडबाजा, वरात, नातेवाइकांची गर्दी आणि विधी सुरू असतानाच पोलिसांनी अचानक घटनास्थळी धडक दिली. विशेष म्हणजे दोघेही अग्नीभोवती फेरे घेत असतानाच पोलिसांनी हा विवाह थांबवला. त्यामुळे एकच खळबळ उडाली. उपस्थितांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

सूत्रांच्या माहितीनुसार पोलीस अधिकारी राहुल वरोटे यांना त्यांच्या खबऱ्यांमार्फत या बालविवाहाची माहिती मिळाली होती. माहिती मिळताच त्यांनी वेळ न दवडता पोलीस पथकासह घटनास्थळ गाठले आणि सुरू असलेला विवाह सोहळा थांबवला. यावेळी पोलिसांनी उपस्थित पालक आणि नातेवाइकांना बालविवाह प्रतिबंधक कायद्याबाबत कठोर शब्दांत समज दिली. बालविवाह हा कायद्याने गंभीर गुन्हा असून पुढे असा प्रकार आढळल्यास थेट गुन्हे दाखल केले जातील, असा इशाराही देण्यात आला. नेरळ पोलिसांनी दोन्ही अल्पवयीन मुलांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले. त्यानंतर समज देऊन त्यांना पालकांच्या स्वाधीन करण्यात आले.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी ग्रामीण भागात बालविवाहविरोधी जनजागृती मोहीम सुरू केली होती. त्याच मोहिमेचा भाग म्हणून नेरळ पोलिसांनी ही मोठी कारवाई केल्याचे बोलले जात आहे. आज शिक्षण, खेळण्याचे आणि भविष्य घडवण्याचे वय असलेल्या दोन चिमुकल्यांना आयुष्यभराच्या जबाबदारीच्या ओझ्यात अडकण्यापासून पोलिसांनी वाचवले. राहुल वरोटे यांच्या या धाडसी आणि तत्पर कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# केंद्रीय मत्स्य सचिवांकडून रायगडातील शोभिवंत मत्स्यबीज बँकेची पाहणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्रीय मत्स्यव्यवसाय सचिव डॉ. अभिलक्ष लिखी यांनी नुकतीच रायगड जिल्ह्यातील मांगरुळ येथे भेट दिली. पंतप्रधान मत्स्यसंपदा योजने अंतर्गत उभारण्यात आलेल्या शोभिवंत मत्स्यबीज बँकेची पाहणी केली. मत्स्यउत्पादकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. यावेळी मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, अतिरीक्त आयुक्त चौगुले, रायगडचे मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त संजय पाटील उपस्थित होते.

मांगरुळ येथील यशोधरा संजय खंडागळे पंतप्रधान मत्स्य संपदा योजने अंतर्गत उभारलेल्या शोभीवंत मत्स्यबीज बँक प्रकल्पाची त्यांनी पहाणी केली. ही बीज बँक देशातील आपल्या प्रकारातील पहिलीच संकल्पना असून येथे २५





हून अधिक प्रकारच्या शोभिवंत माशांचे संवर्धन आणि प्रजनन केले जाते.या बीज बँकेत आतापर्यंत २० प्रजातींतील सुमारे ७ लाख ७ हजार शोभिवंत माशांचे उत्पादन करण्यात आले आहे. ज्यातून अंदाजे १ कोटी.९३ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. तसेच २५ ते ३० जणांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला आहे. या प्रकल्पात ७०० हून अधिक टाक्या आहेत. ज्यात मत्स्यबीज उत्पादन घेतले जाते. कौशल्य विकास, रोजगार निर्मिती व आधुनिक पद्धतींचा अवलंब करून शोभिवंत मास्यांचे उत्पादन घेतले जात आहे. ज्यातून मोठ्या प्रमाणात निर्यातही होऊ लागली आहे. येथून अमेरिकेसह इटली, फ्रान्स, मॉरिशस, दक्षिण कोरिया, कतार, कुवेत, मलेशिया, चीन, उझबेकिस्तान, नायजेरिया व इस्रायलमध्ये शोभिवंत माशांची निर्यात केली जाते. मत्स्य व्यवसाय क्षेत्रात नावीन्य, शाश्वतता व विकासाला चालना देण्यासाठी शासनाच्या सहाय्याचा प्रभावी वापर कसा होऊ शकतो याचे हे उत्तम उदाहरण असल्याचे मत अभिलक्ष लिखी यांनी व्यक्त केले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून ‘केपीआयटी’चे रवी पंडित यांना श्रद्धांजली

**मुंबई : प्रतिनिधी**

माहिती तंत्रज्ञानाच्या साह्याने वाहन उद्योगाच्या आधुनिकीकरणात मोलाचे योगदान देणारे पहिल्या फळीतील मार्गदर्शक अशा उद्योजकाचे निधन भारतातील उद्योग–तंत्रज्ञान क्षेत्राची मोठी हानी आहे, अशी भावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केपीआयटी टेक्नॉलॉजीसचे संस्थापक सहअध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रवी पंडित यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणाले की, स्व. पंडित यांनी नेहमीच उद्योजकता आणि नावीन्यता यांचा पुरस्कार केला. त्यांनी केपीआयटी टेक्नॉलॉजीसच्या माध्यमातून ऑटोमोटिव्ह, उत्पादन आणि ऊर्जा उद्योगांसाठी माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात पुढाकार घेतला. याशिवाय ते ‘जनवाणी’ सामाजिक संस्था, ‘पुणे इंटरनॅशनल सेंटर’, ‘आगा खान रुरल सपोर्ट प्रोग्राम’ यांच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात सक्रिय राहिले. यूके–भारत व्यावसायिक व शैक्षणिक संबंधांना प्रोत्साहन देण्यात अग्रभागी होते. ज्येष्ठ उद्योजक पंडित यांच्या निधनामुळे या क्षेत्रातील अभ्यासू आणि दोन पिढ्यांदरम्यानचा दूवा हरपला. पंडित यांच्या निधनामुळे केपीआयटी उद्योग समूह आणि त्यांच्या परिवारावर आघात झाला आहे. या सर्वांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असे नमूद करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ उद्योजक रवी पंडित यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## रिक्षाचालकाच्या लेकीची गरूडझेप; माधुरी पारदुले पोलीस दलात!

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील मामवली–निरंजनवाडी या छोट्याशा खेड्यातून उगवलेली एक प्रेरणादायी यशोगाथा आज सर्वांच्या अभिमानाचा विषय ठरली आहे. अत्यंत साध्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील माधुरी नथुराम पारदुले हिने आपल्या अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर थेट नवी मुंबई पोलीस दलात दमदार निवड मिळवत गावासह संपूर्ण तालुक्याचा मान उंचावला आहे. रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या वडिलांच्या कष्टाची जाणीव मनात ठेवत माधुरीने आपल्या स्वप्नासाठी संघर्षाचा मार्ग निवडला. घरची परिस्थिती कठीण असतानाही तिने शिक्षणासोबत पोलीस भरतीची तयारी सुरू ठेवली. मर्यादित साधनसामग्री आणि ग्रामीण भागातील अडचणींना न जुमानता तिने आपलं ध्येय डोळ्यासमोर ठेवून सातत्याने मेहनत घेतली.



कठोर शारीरिक सराव, अभ्यासातील सातत्य व अपार आत्मविश्वासाच्या जोरावर माधुरीने पोलीस भरती प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा यशस्वीपणे पार केला. अखेर तिचं पोलीस दलात स्थान निश्चित झालं. या यशामागे तिचे वडील नथुराम पारदुले, आई नेहा पारदुले आणि कुटुंबीयांचा भक्कम पाठिंबा आहे. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच माधुरी आज यशाच्या उंच शिखरावर पोहचली आहे.

माधुरीची यशोगाथा ग्रामीण भागातील मुलींसाठी प्रेरणा आहे. जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वास असेल तर कोणतेही स्वप्न अशक्य नाही, हे तिने सिद्ध करून दाखवले आहे.

तिच्या अभिमानास्पद यशाबद्दल गावातील ग्रामस्थ, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि मित्रपरिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कर्जत पोस्ट कार्यालयातील जनरेटर साडेतीन वर्षांनंतर सुरू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात वारंवार वीज पुरवठा खंडित होतो. कर्जत पोस्ट कार्यालयातील जनरेटर साडेतीन वर्षांपासून नादुरुस्त होते. त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला की पोस्ट कार्यालयातील संपूर्ण कामकाज बंद होत असे. त्यामुळे ग्राहकांची गैरसोय होत होती. सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांनी आठ महिने सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर हा जनरेटर सुरु झाला आणि वीज खंडित झाली तरी ग्राहकांना सेवा उपलब्ध होत आहे.

ऑक्टोबर २०२२ पासून कर्जत पोस्ट कार्यालयातील जनरेटर नादुरुस्त झाला होता. त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला की पोस्टाचे कामकाज ठप्प होत होते. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना हेलपाटा



पडत असे. ही बाब कर्जत शहरातील नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांच्या निदर्शनास आणून दिली. ओसवाल यांनी याबाबत मुंबई येथील मुख्य पोस्ट कार्यालयात आठ महिने सतत पाठपुरावा केला. त्यावेळी कर्जत पोस्ट कार्यालयाकडून जनरेटर बंद असल्याचे आम्हाला कळविलेच गेले नाही, असे महाराष्ट्र पोस्टल सर्कलकडून सांगण्यात आले, असे ओसवाल यांना कळविले.

कर्जत पोस्ट ऑफिसमधील जनरेटरच्या दुरुस्तीसाठी जनरेटर ऑपरेटरशी संपर्क केला व खर्चाचे अंदाजपत्रक घेतले. ते वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविले. मात्र मंजुरीसाठी अडचण येत असल्याचे समजताच ओसवाल यांनी पाठपुरावा केला. त्यावेळी खर्च मंजुरीसाठी सक्षम अधिकाऱ्यांनी मान्यता दिली. ती नवी मुंबई विभागाला कळवली आहे. हे काम लवकरच पूर्ण होण्याची अपेक्षा आहे असे कळविले. या उत्तराने ओसवाल यांचे समाधान झाले नाही. त्यांनी आपला पाठपुरावा सतत सुरूच ठेवला. अखेर सर्व खर्चाला मंजुरी मिळाली आणि जनरेटर दुरुस्त करण्यात आला. त्यामुळे आता वीज पुरवठा खंडित झाला तरी पोस्टाचे काम सुरळीतपणे सुरू असते.

## सुधागड तालुक्याचे उल्लेखनीय यश; पाच शाळांचा १०० टक्के निकाल

**पाली : प्रतिनिधी**

एसएससी परीक्षा २०२६ मध्ये सुधागड तालुक्यातील पाच शाळांनी १०० टक्के निकालाची नोंद केली असली तरी उर्वरित शाळांनीही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अनेक शाळांनी नव्वद टक्क्यांहून अधिक निकाल मिळवत शैक्षणिक गुणवत्ता कायम राखली आहे. प्रबोधनकार ठाकरे माध्यमिक विद्यालय परीक्षेला बसलेले विद्यार्थी : १८, उत्तीर्ण : १८, निकाल : १०० टक्के. श्री बल्लाळ विनायक माध्यमिक प्रशाला परीक्षेला बसलेले विद्यार्थी : १९, उत्तीर्ण : १९, निकाल : १०० टक्के. टॉपवर्ध इंग्लिश मीडियम स्कूल परीक्षेला बसलेले विद्यार्थी : ६९, उत्तीर्ण : ६९, निकाल : १०० टक्के. श्री राज एज्युकेशनल सेंटर परीक्षेला बसलेले विद्यार्थी : ५३, उत्तीर्ण : ५३, निकाल : १०० टक्के. सेंट फ्रान्सिस इंटरनॅशनल स्कूल परीक्षेला बसलेले विद्यार्थी : ५, उत्तीर्ण : ५, निकाल : १०० टक्के. सुधागडमधील उर्वरित शाळांचाही उल्लेखनीय निकाल लागला.

अनुदानित आदिवासी आश्रमशाळेचा ९७.७७ टक्के निकाल लागला. ४५ पैकी ४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा ९३.६१ टक्के, तर जी. बी. वडेर हायस्कूलचा ९३.०१ टक्के निकाल लागला. माध्यमिक विद्यालयाने ९१.६६ टक्के, तर डॉ. प्रभाकर आर. गावंड विद्यालय या शाळेने ९१.३० टक्के निकालाची नोंद केली आहे.

स्वामी विवेकानंद विद्यालय या शाळेचा निकाल ८७.५० टक्के लागला. याशिवाय माध्यमिक विद्यालय ८५ टक्के, एस. ई. एस. आत्मोन्नती विद्यामंदिर ८४.३७ टक्के, जागृती हायस्कूल ८४.२१ टक्के, एकलव्य आदिवासी माध्यमिक आश्रमशाळा ७८.७२ टक्के, शारदा विद्या मंदिर ७५ टक्के, माध्यमिक विद्यालय ७१.४२ टक्के, माध्यमिक विद्यालय ७० टक्के, तर दुसऱ्या अनुदानित आदिवासी आश्रमशाळा शाळेचा निकाल ६९.६९ टक्के लागला आहे.

# चौक वावंढळ परिसराला तुफान पाऊस, जोरदार वाऱ्याने झोडपले; मालमत्तेचे नुकसान

**मोहोपाडा, चौक : प्रतिनिधी**

शनिवारी सायंकाळी वावंढळ गावाला धूळ, तुफान पाऊस आणि जोरदार वाऱ्याने झोडपून काढले. एवढा वारा पाऊस होता की घरातून बाहेर पडण्याची हिंमत नव्हती. सायंकाळी उशिरा सर्व शांत झाल्यावर झालेल्या नुकसानीचा अंदाज आला. लाखो रुपयांचे नुकसान झाले असून तहसीलदार अभय चव्हाण यांनी दखल घेतली असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, विद्युत मंडळाचे उपकार्यकारी अभियंता महादेव मुंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

काल सायंकाळी वावंढळ परिसरात वारा आणि पाऊस एवढा तुफान होता की





काही अनुमान करणे शक्य नाही.अचानक धुळीचे लोट सुरू झाले,या धुळीने घरांची, परिसराची धुळदान केल्या नंतर जोरदार वारा आणि पावसाने थैमान घातले.

गावातील पुरातन हनुमान मंदिराचे छप्पर पूर्णपणे उडून गेले असून, प्राथमिक शाळा वावंढळ वरती जांभळाचे झाड पडून मोठे नुकसान झाले असून शाळेच्या छपरावर असलेल्या सोलर पॅनलचे नुकसान झाले आहे. वावंढळ स्मशानभूमी पूर्णपणे कोलमडून पडली, तर खुद्द तलाठी कार्यालयाचे छप्पर उडवून गेले आहे. गावातील अनेकांच्या घरांचे मोठे नुकसान झाले असून, काहीच्या घरांवर छप्पर राहिले नाही. मोठ मोठी झाडे उन्मळून पडली आहेत. काही झाडे रस्त्यावर पडल्याने काही काळ रस्ता बंद होता, परंतु गावातील ग्रामस्थ व तरुणांनी स्वतः मेहनत घेऊन हा अडथळा दूर केला आहे. उभ्या असलेल्या संरक्षण भिंती पडून मोठे नुकसान झाले असून यावरून जोरदार वाऱ्याचा अंदाज वर्तवला जात आहे. गावातील विद्युत यंत्रणा कोलमडून पडली असल्याने पाणी पुरवठा बंद झाला. येथे पाणीटंचाई असल्याने पाण्याचे स्तोत्र दूरवर आहेत. त्यामुळे या कडक उन्हातून पाणी आणणे खूप कठीण झाले आहे. या नुकसानीसंदर्भात पत्रकार अर्जुन कदम यांनी खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांना अवगत केले असून त्यांच्या आदेशानुसार ग्राम महसूल अधिकारी उदय देशमुख सकाळपासून घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करीत आहेत. नुकसानभरपाईचे पंचनामे सुरू आहेत.

## दुखवटा

### प्रभावती पाटील



**पेण :** कोप्रोली गावचे रहिवासी भूपती जनार्दन पाटील यांच्या मातोश्री प्रभावती जनार्दन पाटील यांना वयाच्या ९३ व्या वर्षी देवाज्ञा झाली. प्रभावती पाटील ब्रह्मचैतन्य शंकर महाराज रसाळ यांच्या अनुग्रहित शिष्य होत्या. प्रेमळ व मनमिळावू स्वभाव, भूतदया, परोपकार हा त्यांचा पिंड होता. त्यांना चार मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. शेवटचा श्वास त्यांनी सद्गुरू चिंतनात सोडला. इंचगिरी रसाळ संप्रदायाचे मठाधिपती पांडुरंग महाराज यांनी या परिवाराचे सांत्वन केले.

### कृष्णा भोसले



**तळा :** तळा तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार कृष्णा भोसले यांचे गुरुवार ७ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

पत्रकार कृष्णा भोसले यांच्या लेखणीत सत्याची ताकद होती. अन्यायाविरोधात लढण्याची जिद्द होती. त्यांनी आयुष्यभर पत्रकारितेला केवळ व्यवसाय न मानता समाजसेवेचे माध्यम मानले. तालुक्यातील विविध समस्या मार्गी लावण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. ग्रामस्थांचे, समाजबांधवांचे विविध प्रश्न ते न्यायिक पद्धतीने सोडवत असत. ग्रामस्थांमधील मतभेद दूर करून गावाला एकसंघ ठेवण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## पान १ वरुन

# उलवे नोडमध्ये बुधवारी लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी अभीष्टचिंतन सत्कार आणि शाळा इमारतीचा उद्घाटन सोहळा

ते पुढे म्हणाले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक कार्यातून हजारो युवकांना रोजगार, शिक्षण व सामाजिक आधार देण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक शैक्षणिक आणि सामाजिक संस्था उभ्या राहिल्या असून समाजातील सर्व घटकांसाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. समाजकारणाला प्राधान्य देणारे आणि दानशूर वृत्तीचे नेतृत्व म्हणून ते ओळखले जातात. गरीब कुटुंबातून पुढे येत त्यांनी संघर्षाच्या जोरावर आपले स्थान निर्माण केले. त्यांच्या कार्याचा मुख्य गाभा समाजसेवा आहे. शिक्षण, सामाजिक, आरोग्य, क्रीडा, सांस्कृतिक, आपत्ती मदत या क्षेत्रांमध्ये त्यांनी मोठे योगदान दिले आहे. अनेक शिक्षण संस्थांना मदत करून ग्रामीण आणि कष्टकरी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे त्यांनी खुली केली.

सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून लोकनेते रामशेठ ठाकूर सतत गरजू लोकांना मदत करतात. समाजातील वंचित, पीडित आणि गरजू लोकांना आधार देणे हे त्यांचे जीवनव्रत आहे. राजकारणात असूनही त्यांनी नेहमी समाजकारणाला अग्रक्रम दिला. त्यांच्या साधेपणा, जनसंपर्क आणि लोकाभिमुख कार्यामुळे ते महाराष्ट्रातील एक आदर्श लोकनेते म्हणून ओळखले जातात. त्यामुळे त्यांचे अमृत महोत्सवी वर्ष महत्त्वाचे आणि प्रेरणादायी आहे. त्याच अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनावर आधारित आढावा घेणाऱ्या ‘रामपर्व’ या विशेष पुस्तकाची निर्मिती करण्यात आली असून त्याचे प्रकाशनही यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

उलवे परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे या उद्देशाने उभारण्यात आलेली रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल ही प्रशस्त इमारत सुसज्ज वर्गखोल्या, अत्याधुनिक सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण पद्धतीमुळे परिसरासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या विद्यालयाचा उद्घाटन सोहळा यावेळी संपन्न होणार आहे.

या विशेष सोहळ्यास पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर, लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समितीचे अध्यक्ष आमदार महेश बालदी, समितीचे कार्याध्यक्ष व ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे यांनी या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले आहे.

## फिजिओ सेंटरचे उद्घाटन; रुग्णांना मिळणार प्रभावी उपचार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा परिसरातील नागरिकांसाठी आधुनिक फिजिओथेरपी उपचार सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बडेकर फिजिओ सेंटरचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. हे सेंटर डॉ. विशाखा बडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आले असून रुग्णांना आधुनिक व प्रभावी फिजिओथेरपी उपचार देण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

या सेंटरमध्ये आधुनिक उपकरणांसह रुग्णांसाठी उपचार पद्धती उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. उद्घाटन प्रसंगी सरपंच उमाताई मुंढे, जिल्हा परिषद सदस्या स्नेहा पारंगे, जिल्हा परिषद सदस्य संतोष बैलमारे, माजी सरपंच संदीप मुंढे, माजी सरपंच अशोक मुंढे, माजी उपसरपंच दत्ता जांभळे, माजी उपसरपंच सुरेश पाटील, नंदा जांभुळकर, एम. के. गडगे, एकनाथ मते आदी उपस्थित होते.



## महाराष्ट्र राज्यस्तरीय आदर्श शिक्षकरत्न पुरस्काराने कृष्णा दांडेकर सन्मानित

**पेण : प्रतिनिधी**

सुधागड एज्युकेशन सोसायटीतील सहा. शिक्षक कृष्णा दांडेकर रा. पेण यांना महाराष्ट्र राज्यस्तरीय आदर्श शिक्षकरत्न पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे.



पेण येथील डॉ. कृष्णा दांडेकर यांचे शिक्षण एमकॉम, बीएडपेक्षा अधिक आहे. आपण शिक्षण घेतले पण आपल्यासारखे अनेक विद्यार्थी जिल्ह्यात आहेत ज्यांचे शिक्षण गरीबीमुळे झाले नाही. काहींना शिक्षण सोडून नोकरी करावी लागली. अशा अनेक रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना दांडेकर सरांनी मार्गदर्शन करून वेळेला आपल्या खिशातील पैसे भरून गरीब गरजू विद्यार्थ्यांच्या मागे उभे राहुन मोलाचे मार्गदर्शन करून असे हजारो विद्यार्थ्यांना घडण्यासाठी रात्रंदिवस धडपड करून आज कित्येक विद्यार्थी विविध पदांवर कार्यरत आहेत. याव्यतिरिक्त १९९८ पासून सुधागड शिक्षण संस्थेत शिक्षण सेवेत असणाऱ्या व गरजू विद्यार्थ्यांना स्वखर्चाने शिकवणाऱ्या कृष्णा दांडेकर यांना एमबीएएस महासेवक दिव्यांग फाउंडेशन आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२६ यांनी पुणे येथे शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यात त्यांची पत्नी, मुलगी व राजेंद्र पालवे यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. त्यांच्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# पनवेल परिसरात धुळीच्या वावटळीसह अवकाळी पाऊस; नागरिकांची तारांबळ

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यात ९ मे रोजी दुपारनंतर अचानक वातावरणात मोठा बदल झाला. जोरदार वादळी वाऱ्याने संपूर्ण परिसर हादरून गेला, तर त्यानंतर ग्रामीण भागात अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. अचानक बदललेल्या हवामानामुळे काही काळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.



दुपारी चार ते पाच वाजण्याच्या सुमारास पनवेल शहरासह खारघर, कामोठे, कळंबोली, नेरे, वावंजे, पळस्पे आणि इतर ग्रामीण भागात जोरदार वादळी वारे वाहू लागले. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की सर्वत्र धुळीचे लोट उठले होते. अनेक भागांमध्ये काही वेळ दृश्यमानताही कमी झाली होती. घरांच्या खिडक्या-दारे जोरात आपटत होती, तर अनेक घरांमध्ये धुळ शिरल्याने नागरिकांची गैरसोय झाली.

वादळी वाऱ्यामुळे वाहनचालकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. रस्त्यावर उडणाऱ्या धुळीमुळे दुचाकीस्वारांनी वाहने रस्त्याच्या कडेला थांबवून आश्रय घेतला. काही ठिकाणी झाडांच्या फांद्या रस्त्यावर पडल्याच्या घटना घडल्या. तसेच अनेक ठिकाणी जाहिरातींचे फलक, बॅनर कोसळल्याचेही पाहायला मिळाले.

यानंतर नेरे परिसरासह ग्रामीण भागात पावसाला सुरुवात झाली. अचानक सुरू झालेल्या पावसामुळे बाजारपेठांमध्ये धावपळ उडाली. पावसापासून बचावासाठी नागरिकांनी दुकानांच्या आडोशाला आश्रय घेतला. अनेक नागरिक या पावसात भिजल्याचे चित्र दिसून आले. काही ठिकाणी अल्प प्रमाणात पाणी साचल्याने वाहतुकीवरही परिणाम झाला.

दरम्यान, मागील काही दिवसांपासून वाढलेल्या उकाड्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला. वातावरणात गारवा निर्माण झाल्याने संध्याकाळी हवामान आल्हाददायक झाले होते, मात्र अवकाळी पावसामुळे शेतकरी वर्गात चिंता व्यक्त केली जात असून, फळबागा आणि भाजीपाला पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे, पण दुसऱ्या दिवशी जास्त गरम होण्याची शक्यताही व्यक्त केली होती, ती खरी ठरली.

# कळंबोलीत बीट मार्शलने बुडणाऱ्या महिलेचा वाचवला जीव

## पोलीस शिपाई आकाश माळीची धाडसी कामगिरी

**कळंबोली : प्रतिनिधी**

रविवारी कंट्रोल रूम येथून रोडपाली गणपती विसर्जन तलावमध्ये एक महिलेने पाण्यात उडी मारली असून तिला पोलीस मदतीची आवश्यकता आहे. असा संदेश प्राप्त होताच कामगिरीवर तैनात असलेले बीट मार्शल आकाश माळी यांनी त्वरित अवघ्या तीन मिनिटात रोडपाली तलावाजवळ जाऊन बुडणाऱ्या महिलेला थरारकरीत्या स्वतःच्या जीवाची परवा न करता पाण्यातून बाहेर काढून जीव वाचवला. या धाडसी कामगिरीची दखल वरिष्ठांनी घेऊन आकाश माळी यांना कौतुकाची थाप दिली आहे.

रविवारी कंट्रोल रूम येथून बीट मार्शल १ च्या म. डी. टी. वर १२.३० वाजता संदेश प्राप्त झाला की कळंबोली पोलीस ठाणे बीट मार्शल १ वारिल पो शिपाई १२३३६ /आकाश वानखेडे आणि पोलीस शिपाई ४३४९/ सागर माळी हे ताबडतोब



घटनास्थळी १२.३३ वाजता पोहोचले. त्याना तलावा मध्ये पाण्यात उड़ी मारलेली महिला बूड़त असल्याचे दिसल्याने पोलीस शिपाई क्रमांक ४३४९ सागर माळी याने जिवाची पर्वा न करता तत्काल पाण्यात उडी मारून सदर महिलेस तलावातून सुखरूप बाहेर काढले आणि आशा हॉस्पिटल येथे पोलीस गाडीत बसून उपचारासाठी दाखल केले. रोडपाली तलावात उडी मारणाऱ्या महिलेचे नाव अनिता बालाजी नांदे वय पस्तीस वर्ष असून मुली वसाहती मध्ये राहत आहे. सदर महिला मनोरुग्ण असल्याचे समजते. डॉक्टरांनी तपासून प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. हॉस्पिटलमध्ये महिलेचा भाऊ हजर झाला असून पुढील उपचारासाठी MGM हॉस्पिटल येथे पोलीस गाडीने उपचारासाठी रवाना केले .

स्वतःचा जीव धोक्यात घालून रोडपाली तलावात बुडणाऱ्या महिलेचा जीव वाचवणाऱ्या बिट मार्शल आकाश माळीचे कळंबोलीतील विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# काठमांडूत भारताचा झेंडा उंचावणाऱ्या पनवेलच्या 'सात रत्नां'चे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

काठमांडू नेपाळ येथे पार पडलेल्या सातव्या एशियन आणि इंटरनॅशनल सवात चॅम्पियनशिप २०२६ मध्ये दमदार कामगिरी करत भारताचा झेंडा उंचावणाऱ्या पनवेलच्या 'सात रत्नांनी' रविवारी माजी खासदार तथा लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत त्यांचे आशीर्वाद घेतले. या वेळी खेळाडूंच्या ऐतिहासिक यशाबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.



नेपाळमधील काठमांडू युनिव्हर्सिटी येथे ३० एप्रिल ते ३ मे २०२६ दरम्यान झालेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत भारताने उल्लेखनीय कामगिरी करत दुसऱ्या क्रमांकाची चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकावली. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी २ सुवर्ण, ७ रौप्य आणि १५ कांस्य पदके जिंकत देशाच्या यशात मोठा वाटा उचलला. या यशामागे प्रशिक्षक भूपेंद्र शिवाजी गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

त्यांनी २००६ पासून पनवेलमधील सी.के.टी. महाविद्यालयात सातत्याने प्रशिक्षण देत अनेक खेळाडूंना घडवले आहे. पनवेलच्या मातीतून घडलेले 'सात रत्न' म्हणून ओळखले जाणारे आदित्य खंडीझोड, यश मोरे, ध्रुव कोलतेकर, ध्रुव दिघाडे, प्रमोद ठोंबरे, अविर बनसोडे आणि मंथन रोटे या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्वल कामगिरी करत पनवेलचे नाव जगभर पोहोचवले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या सर्व खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत, "तुमची मेहनत, जिद्द आणि शिस्त हीच खरी ताकद आहे. भविष्यातही असेच यश संपादन करून देशाचे नाव उज्वल करा," असे प्रेरणादायी मार्गदर्शन केले. पनवेलच्या क्रीडा क्षेत्रासाठी हा अभिमानाचा क्षण असून, या 'सात रत्नांच्या' यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



**पनवेल : अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद आणि पनवेल महानगर प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सत्कार संस्थेचे विश्वस्त एस. एम. देशमुख व अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांच्या पुढाकाराने करण्यात आला. या वेळी माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महानगर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे, सल्लागार गणेश कोळी, विजय पवार आणि इतर सदस्य उपस्थित होते.**

# लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय कामोठेचा एसएससी निकाल ९८.१४%

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते दि.बा पाटील विद्यालय कामोठे येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे यंदाच्या बोर्डाच्या एस.एस.सी. परीक्षेमध्ये विद्यालयाचा निकाल ९८.१४% लागला आहे. यामध्ये कुमारी श्रावणी योगेश रणनवरे हिने ९४.६० % गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला, कुमारी तेजस्विनी पोपट गीते हिने ९३ %मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला, कुमारी श्रुतिका गंगाराम जानकर आणि सत्यम राजेश धुमाळ या दोघांनी ९२.२०% मिळवून तृतीय क्रमांक मिळवला.



विद्यालयाच्या या यशाबद्दल विद्यार्थी,सर्व सेवक वृंद यांचे स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन जयदास गोवारी, माजी चेअरमन स्वामी अप्पा म्हात्रे, व्हाईस चेअरमन विनायक म्हात्रे, माजी चेअरमन बाळाराम चिपळेकर, विद्यालाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, माजी विद्यार्थी संघ, सर्व ग्रामस्थ यांनी कौतुक केले.

डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त ८ मे रोजी सादर होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या माऊली संत ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळा या कार्यक्रमाची निवड झाली होती. योगायोगाने याच दिवशी दहावीचा निकाल लागला कार्यक्रमांमध्ये सहभागी असलेल्या प्रथम तीन क्रमांकाचे तसेच ९०% गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील कर्मवीर अण्णांच्या समाधी परिसरात रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, सहाय्यक विभागीय अधिकारी विलासराव जगताप यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

# कार उलटून एकाचा मृत्यू, पाच जण जखमी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील चिंचवली-दूंद्रेजवळील चिंचवली बस स्टॅन्डजवळ रस्त्याच्या कडेला जाऊन कार पलटी झाल्याने झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला तर पाचजण जखमी झाले. राजवीर विक्रम सिंग (४०, राहणार ग्रीन एकर सोसायटी वाकडी) असे मृत इसमाचे नाव आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली.

नऊ मे रोजी रात्री दहाच्या सुमारास यातील मयत राजवीर विक्रम सिंग हे त्यांची एर्टिगा कारमध्ये एकूण सहा जण दूंद्रेकडून पनवेलच्या दिशेने जात होते. रात्री दहाच्या सुमारास चिंचवली बस स्टॅन्डजवळ त्यांचे कार वरील नियंत्रण सुटले आणि कार रस्त्याच्या खाली जाऊन पलटी झाली. या झालेल्या अपघातात दोघेजण कारच्या बाहेर फेकले गेले. या अपघातात राजवीर विक्रम सिंग हे गंभीर जखमी झाले. आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला तर अलोक रमेश लोखंडे, मजहर खान, कादर ,रोहन नागपूरकर आणि शाहिद हे पाच जण जखमी झाले.

पनवेल तालुका पोलीस स्टेशनचे अधिकारी, पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृत इसम तसेच जखमी इसमांना रुग्णालयात दाखल केले.

# आत्महत्या केलेल्या तन्वेश पाटीलला दहावीच्या परीक्षेत ८९.२० टक्के गुण

## कुटुंबीय निःशब्द; कुंडेवहाळ ग्रामस्थांकडून हळहळ व्यक्त



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ येथील विद्यार्थी तन्वेश प्रकाश पाटील याला ८९.२० टक्के गुण मिळाले आहेत. तन्वेशने परीक्षेच्या काही दिवसांनी आत्महत्या केली होती, परंतु त्याने परीक्षेत घवघवीत यश मिळवल्याचे निकालानंतर समोर आले. यामुळे कुटुंबीय निःशब्द, तर ग्रामस्थही सुन्न झाले आहेत.

तन्वेश हा प्रकाश पाटील यांचे तिसरे अपत्य. पाटील यांनी प्रतिकूल परिस्थितही आपल्या मुलांना चांगले शिक्षण दिले. दापोली पारगाव येथील अनंता पांडुरंग भोईर विद्यालयात तन्वेश इयत्ता दहावीच्या वर्गात शिकत होता. त्याला दोन बहिणी असून त्यापैकी एक सीएच्या शेवटच्या वर्षात शिकत असून दुसरी एमपीएससी करीत आहे.

तन्वेश अभ्यासात हुशार होता. त्याने यंदा दहावीची परीक्षा दिली होती. आपल्याला सुमारे नव्वद टक्के गुण मिळतील, असे त्याने घरच्यांना सांगितले होते, मात्र परीक्षेच्या दोन दिवसांनी अचानकपणे त्याने आत्महत्या केल्याने कुटुंबियांसह ग्रामस्थांना धक्का बसला.

दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच शिक्षण मंडळाकडून घोषित करण्यात आला. या परीक्षेत तन्वेश ८९.२० टक्के गुण मिळवत विद्यालयातून दुसरा आला आहे, पण हा निकाल पाहण्यासाठी आज तो जगात नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

# अभिनय प्रशिक्षण शिबिराचे आज उद्घाटन

## पनवेल परिसरातील नाट्य कलावंतांचा उत्साही प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ मेपासून १९ मेपर्यंत नऊ दिवसांच्या अभिनय प्रशिक्षण शिबिराचे दिनांक ११ रोजी उद्घाटन होणार आहे.

या उद्घाटनासाठी महापौर नितीन पाटील, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, महापालिका सदस्य तथा रंगकर्मी प्रथमेश सोमण, सन्माननीय महापालिका सदस्य, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त प्रसेनजीत कार्लेकर, सहा.आयुक्त डॉ. रूपाली माने तसेच प्रशिक्षक उपस्थित राहणार आहेत.



हा कार्यक्रम महापालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या तिसऱ्या मजल्यावर सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात उत्तम कलावंत निर्माण व्हावेत यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर कलावंतांसाठी पुर्णतः मोफत आहे. यात शिक्षक- प्राध्यापक कलावंतांसाठी विशेष बॅचचे नियोजन कळंबोली येथे करण्यात आले आहे. तर पनवेल आणि खारघर येथे एक बॅच ही उच्चस्तरीय अभिनय प्रशिक्षणासाठी व एक बॅच प्राथमिक प्रशिक्षणाची आहे. गतवर्षी प्रशिक्षण घेतलेल्यांना वरिष्ठस्तरीय प्रशिक्षण मिळावे यासाठी अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

अभिनय प्रशिक्षण शिबीरासाठी प्रत्येक केंद्रावर दोन गट निश्चित करण्यात आले आहेत. यात पहिला गट वय वर्षे ८ ते १६ तर दुसरा गट हा युवा व प्रौढांसाठी असून १७ ते ६५ वयांपर्यंत कलावंतांना यात सहभाग घेता येईल.

नाट्य, सिने क्षेत्रातील मान्यवरांकडून शिबीरात मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच शेवटी सर्व प्रशिक्षणार्थींचे सादरीकरण होईल. सर्व शिबीरांर्थींना समारोपा दिवशी सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे . खारघर व पनवेल साठी सर्व बॅच फुल्ल झाली आहे. तरी जास्तीत जास्त नागरीकांनी याचा लाभ घ्यावा.

**अशी आहेत प्रशिक्षण स्थळे**

**१) पनवेल - आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह**

**२) खारघर - सिंधुदुर्ग प्रभात समिती अ कार्यालय तिसरा मजला, सभागृह, सेक्टर १९ भूखंड १४ खारघर**

**३) कळंबोली - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन,२४Q३+VC३ रोडपाली**

# ॲड. अभिनय सोमण युवासेना संपर्क प्रमुखपदी

**पनवेल : वार्ताहर**

शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार युवासेनेच्या विधानसभा संपर्क प्रमुख पदांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत.



खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश प्रताप सरनाईक यांच्या विनंतीनुसार तसेच कार्यकारणी सदस्य, विभागीय सचिव तथा रायगड लोकसभा संपर्क प्रमुख विकास गोगावले आणि कार्यकारणी सदस्य, विभागीय सचिव तथाा मावळ लोकसभा संपर्क प्रमुख विश्वजीत बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल विधानसभा संपर्क प्रमुख पदी ॲड. अभिनय चंद्रशेखर सोमण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनीही अभिनय सोमण यांचे प्रत्यक्ष अभिनंदन केले.

# प्रामाणिक स्वच्छतादूत अन्नु पारचे यांचा शाखेतर्फे सत्कार

**पनवेल :** वाल्मिकी शाखेच्या सेवा वस्तीतील वाल्मिकी नगर येथे राहणाऱ्या अन्नु अशोक पारचे यांनी प्रामाणिकपणाचे उत्तम उदाहरण समाजासमोर ठेवले आहे. या अभिमानास्पद घटनेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नगर संघचालक राकेश फाटक यांच्या उपस्थितीत वाल्मिकी नगर येथील गणेश मंदिरात शाखेतर्फे अन्नु पारचे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करुन कार्याचे कौतुक केले.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे स्वच्छतादूत म्हणून कार्यरत असताना अन्नु पारचे यांना कचरापेटीजवळ एक महत्त्वाचा चेक आढळून आला. सदर चेक स्वतःकडे न ठेवता त्यांनी तत्काळ आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करून प्रामाणिकतेचे दर्शन घडविले.

पारचे यांच्या या आदर्श कृतीमुळे समाजात सकारात्मक संदेश निर्माण झाला असून वाल्मिकी समाजासह सर्व स्तरातून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

# विसरलेली पर्स कळंबोली पोलिसांनी केली परत

**कळंबोली : प्रतिनिधी**

रविवारी सोन्याचे दागिने असलेली बॅग कळंबोलीतील बस स्थानकामध्ये विसरलेली होती. परंतु बस स्थानकात कार्यरत असलेले बस स्टॉप नियंत्रक नितीन भारती यांनी तात्काळ घेतलेल्या खबरदारी मुळे बॅग व सोन्याचे दागिने संबंधित महिलेला सुरक्षित रित्या सुपूर्द करून कळंबोली पोलिसांनी स्टाफ नियंत्रकाचा गौरव करून धन्यवाद दिले आहेत.

कमरजहा मोहम्मद रफीक शेख वय ३८ वर्ष यांची सोन्याची बॅग कळंबोली बस स्टॉप मध्ये रविवारी विसरली होती. सदर बॅग कळंबोली बस स्टॉप नियंत्रक म्हणून काम करणारे नितीन भिकू भारती यांच्या यांच्या दृष्टीस पडली. त्यांनी ती सुरक्षितरित्या ताब्यात घेऊन कळंबोली पोलिसांकडे सुपूर्द केली. बस स्थानकात बस स्टॉप नियंत्रक म्हणून काम करणाऱ्या नितीन भारती यांनी दाखवलेल्या कर्तव्यदक्ष पणा मुळे पर्स व त्यातील सोन्याचे दागिने संबंधित महिलेला सुरक्षित रित्या परत मिळू शकले. त्यामुळे कळंबोली पोलीस स्टेशनच्यावतीने नितीन भारती यांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार केला.

संपादकीय


## बंगालचा नवा अध्याय

पश्चिम बंगालच्या राजकारणात ऐतिहासिक परिवर्तन घडवत भारतीय जनता पक्षाने प्रथमच सत्ता मिळवली आणि सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली नव्या पर्वाला सुरुवात झाली आहे. अनेक दशकांपासून डाव्या आघाडीचे वर्चस्व आणि त्यानंतर तृणमूल काँग्रेसची एकहाती सत्ता अनुभवलेल्या बंगालमध्ये आता भाजपच्या विजयाने संपूर्ण देशाचे लक्ष वेधले आहे. हा विजय केवळ एका पक्षाचा सत्ताबदल नसून बंगालच्या राजकीय, सामाजिक आणि वैचारिक प्रवाहातील मोठा बदल मानला जात आहे.

**सुवेंदू अधिकारी यांचा राजकीय प्रवास अत्यंत संघर्षपूर्ण राहिला आहे. तृणमूल काँग्रेसमध्ये दीर्घकाळ प्रभावी नेते म्हणून काम केल्यानंतर त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि अल्पावधीतच पक्षाचे बंगालमधील प्रमुख चेहरे बनले. ग्रामीण बंगालमधील त्यांचा प्रभाव, संघटन कौशल्य आणि आक्रमक प्रचारशैली यामुळे भाजपला मोठा फायदा झाला. विशेषतः हिंदुत्व, राष्ट्रवाद, विकास आणि भ्रष्टाचारविरोधी भूमिकेचा प्रभाव बंगालच्या मतदारांवर स्पष्टपणे दिसून आला. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसने गेली १५ वर्षे बंगालमध्ये सत्ता उपभोगली. सुरुवातीच्या काळात त्यांनी डाव्या आघाडीच्या दीर्घ सत्तेविरोधात परिवर्तनाचे प्रतीक म्हणून लोकप्रियता मिळवली होती, मात्र कालांतराने भ्रष्टाचार, स्थानिक स्तरावरील हिंसाचार, कटमनी प्रकरणे, शिक्षक भरती घोटाळे आणि पक्षीय हस्तक्षेप यांसारख्या मुद्द्यांमुळे जनतेत नाराजी वाढत गेली. ग्रामीण भागातील अनेक मतदारांनी बदलाची इच्छा व्यक्त केली आणि भाजपने त्याच असंतोषाला वाचा फोडली. भाजपच्या विजयामागे संघटनात्मक ताकद हेही एक मोठे कारण आहे. गेल्या काही वर्षांत भाजपने बंगालमध्ये बूथ स्तरापर्यंत मजबूत जाळे निर्माण केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजयुमो, महिला मोर्चा आणि विविध सामाजिक संघटनांच्या माध्यमातून ग्रामीण भागात प्रभाव वाढवण्यात आला. सोशल मीडियाचा प्रभावी वापर, केंद्रीय नेतृत्वाच्या सभा आणि स्थानिक मुद्द्यांवर सातत्याने आक्रमक भूमिका यामुळे भाजपने बंगालमध्ये आपली जागा निर्माण केली. या निवडणुकीत बंगालमध्ये धार्मिक आणि सांस्कृतिक अस्मितेचाही मोठा प्रभाव दिसून आला, परंतु मतदारांनी विकास, सुरक्षा आणि स्थिर प्रशासनाला अधिक महत्त्व दिल्याचे निकालातून स्पष्ट झाले. कोलकाता येथील ऐतिहासिक ब्रिगेड परेड ग्राऊंडवर झालेला शपथविधी सोहळा हा केवळ राजकीय कार्यक्रम नव्हता, तर भाजपच्या राष्ट्रीय विस्ताराचे प्रतीक मानला गेला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह देशभरातील अनेक वरिष्ठ नेत्यांची उपस्थिती या विजयाचे महत्त्व अधोरेखित करणारी होती. महाराष्ट्रातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांची उपस्थितीही लाभली. या सोहळ्यात सुवेंदू अधिकारी यांच्यासोबत दिलीप घोष, अग्निमित्रा पॉल, अशोक कीर्तनिया, खुदीराम टुडू आणि निसिथ प्रमाणिक यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. या मंत्रिमंडळात अनुभवी आणि तरुण नेतृत्वाचा समतोल साधण्याचा प्रयत्न दिसून येतो. भाजपसाठी हा विजय राष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. बंगालसारख्या वैचारिकदृष्ट्या वेगळ्या राज्यात सत्ता मिळवणे म्हणजे भाजपच्या विस्तारवादी राजकारणाला मोठे यश मानले जात आहे. यामुळे आगामी लोकसभा निवडणुकांमध्येही पक्षाला मानसिक बळ मिळण्याची शक्यता आहे.**

# जागतिक तापमान वाढ : एक गंभीर संकट






पृथ्वी हा आपला एकमेव निवारा आहे. पण गेल्या १५० वर्षांत मानवाने केलेल्या बेसुमार प्रगतीमुळे या निवाऱ्याचं तापमान झपाट्याने वाढत आहे. यालाच आपण 'जागतिक तापमान वाढ' किंवा 'Global Warming' म्हणतो. ही केवळ पर्यावरणाची समस्या नाही, तर आपल्या अस्तित्वाचीच समस्या बनली आहे. १८८० पासून पृथ्वीचं सरासरी तापमान १.२C ने वाढलं आहे आणि यातील दोन–तृतीयांश वाढ १९७५ नंतर झाली आहे. सूर्यापासून येणारी ऊर्जा पृथ्वी शोषून घेते आणि परत अवकाशात परावर्तित करते. वातावरणातील काही वायू – कार्बन डायऑक्साइड CO, मिथेन CH, नायट्रस ऑक्साइड NO, पाण्याची वाफ – ही उष्णता अडवून धरतात. यालाच 'हरितगृह परिणाम' म्हणतात. हा परिणाम नैसर्गिक आहे आणि त्यामुळेच पृथ्वीवर जीवन शक्य झालं. पण औद्योगिक क्रांतीनंतर आपण कोळसा, पेट्रोल, डिझेल जाळून अतिरिक्त हरितगृह वायू सोडायला लागलो. त्यामुळे पृथ्वीचं 'ब्लँकेट' जाड झालं आणि तापमान वाढू लागलं. NASA च्या आकडेवारीनुसार, वातावरणातील CO चे प्रमाण औद्योगिक काळापूर्वी २८० ppm होते, ते आता ४२० ppm पेक्षा जास्त झालं आहे. हे प्रमाण गेल्या ८ लाख वर्षांत कधीच नव्हतं.

झाडे CO शोषतात. अमेझॉनसारखी जंगले कापल्यामुळे नैसर्गिक CO फिल्टरच नष्ट होत आहे. दरवर्षी १ कोटी हेक्टर जंगल नष्ट होते. भातशेती आणि गुरांच्या ढेकरांमधून मिथेन बाहेर पडतो. मिथेन CO पेक्षा २५ पट जास्त उष्णता अडवतो. सिमेंट, स्टील, प्लास्टिक निर्मितीतून मोठ्या प्रमाणावर वायू उत्सर्जन होते.

डम्पिंग ग्राउंडवर कुजणाऱ्या कचऱ्यातून मिथेन तयार होतो. तापमान वाढल्यामुळे ऋतुचक्र बिघडलं आहे. महाराष्ट्रातच बघा अवकाळी पाऊस, गारपीट, दुष्काळ आणि महापूर एकाच वर्षात येतात. २०२३ हे नोंदवलेलं सर्वात उष्ण वर्ष ठरलं. आर्क्टिक समुद्रातील बर्फ दर दशकाला १३% ने कमी होत आहे. हिमालयातील हिमनद्या वितळत असल्याने गंगा, ब्रह्मपुत्रा यांसारख्या नद्यांना धोका आहे. भविष्यात पाण्याचं संकट गंभीर होईल. बर्फ वितळणे आणि पाणी गरम झाल्यावर प्रसरण पावणे या दोन्हीमुळे समुद्रपातळी वाढत आहे. १९०१ पासून समुद्र २० सेंमी वाढला आहे. मालदीव, मुंबई, कोलकाता, चेन्नई यांसारख्या किनारी शहरांना धोका आहे. प्रवाळ भित्तिका 'कोरल ब्लीचिंग'मुळे मरत आहेत. ध्रुवीय अस्वल, पेंग्विन यांचा अधिवास नष्ट होतोय. भारतातील १२% प्रजाती २१०० पर्यंत नष्ट होऊ शकतात. तापमान वाढल्याने गहू, तांदूळ यांच्या उत्पादनावर परिणाम होतो. २C वाढ झाली तर भारतातील अन्नधान्य उत्पादन १०–४०% ने घटू शकतं. उष्णतेच्या लाटा वाढल्या आहेत. डेंग्यू, मलेरिया सारखे आजार नवीन भागात पसरत आहेत. वायू प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार वाढले आहेत. भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा कार्बन उत्सर्जक देश आहे, पण दरडोई उत्सर्जन अमेरिका, चीनपेक्षा खूप कमी आहे. तरीही आपल्याला सर्वात जास्त फटका बसतोय. IMD नुसार भारताचं तापमान १९०१ पासून ०.७C ने वाढलं आहे. २०२४ मध्ये कल्याण, दिल्ली, नागपूर येथे तापमान ४५C पार गेलं होतं. ही समस्या जागतिक आहे, त्यामुळे उत्तरही जागतिकच हवं. २०१५ च्या पॅरिस करारात जगातील १९५ देशांनी तापमानवाढ १.५C पर्यंत मर्यादित ठेवायचं ठरवलं. सौर, पवन, जल ऊर्जेचा वापर वाढवणे. भारताने २०३० पर्यंत ५०० GW अक्षय ऊर्जा क्षमता गाठण्याचं लक्ष्य ठेवलं आहे.

झाडे लावणे आणि जंगल वाचवणे. 'ग्रीन इंडिया मिशन' अंतर्गत काम सुरू आहे. पेट्रोल–डिझेल ऐवजी EV ना प्रोत्साहन. कार्बन कॅप्चर हवेतून CO शोषून जमिनीत साठवण्याचे तंत्रज्ञान. वैयक्तिक पातळीवर आपण काही उपाय करू शकतो. गरज नसेल तेव्हा लाईट, पंखे, AC बंद करा. LED बल्ब वापरा. ५–स्टार रेटिंगची उपकरणे घ्या. शक्य तेव्हा बस, ट्रेन, सायकल वापरा. कार पूलिंग करा. आठवड्यातून १–२ दिवस मांसाहार टाळला तरी कार्बन फूटप्रिंट कमी होतो. ओला–सुका कचरा वेगळा करा. कंपोस्ट करा. प्लास्टिक कमी वापरा. प्रत्येक वाढदिवसाला एक झाड लावा. प्राण्यांसाठी घरात थोडी हिरवळ तयार करा. थेंबे थेंबे तळे साचे. जागतिक तापमान वाढ ही 'भविष्यातील' समस्या राहिलेली नाही. ती 'आजची' समस्या आहे. शास्त्रज्ञ सांगतात की, आपल्याकडे २०३० पर्यंत वेळ आहे. जर आता कृती केली नाही, तर आपली पुढची पिढी अशा पृथ्वीवर जगेल जिथे राहणं कठीण होईल. पण घाबरून चालणार नाही.

प्रत्येक लहान कृती महत्वाची आहे. सरकार, उद्योग आणि प्रत्येक नागरिकाने मिळून काम केलं तर आपण हे संकट परतवू शकतो. कारण पृथ्वीला आपली गरज नाही, आपल्याला पृथ्वीची गरज आहे. आज संपूर्ण जगासमोर उभे असलेले सर्वात मोठे आव्हान म्हणजे पृथ्वीच्या तापमानात होणारी सतत वाढ. यालाच आपण ग्लोबल वॉर्मिंग म्हणतो. औद्योगिक क्रांतीनंतर मानवाने निसर्गाचा अतिवापर सुरू केला आणि त्यातून कार्बन डायऑक्साइड, मिथेन, नायट्रस ऑक्साइड यांसारख्या हरितगृह वायूंचे प्रमाण वातावरणात प्रचंड वाढले. हे वायू पृथ्वीभोवती एक चादर निर्माण करतात आणि सूर्याची उष्णता परत अवकाशात जाऊ देत नाहीत. त्यामुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत आहे. याचे परिणाम आपण मुंबईतही अनुभवतो आहोतः वाढत्या उष्णतेच्या लाटा, अवकाळी पाऊस, समुद्राची पातळी वाढणे. ही वाढ रोखायची असेल तर प्रत्येकाने जबाबदारीने पावले उचलणे गरजेचे आहे. सर्वात पहिला आणि प्रभावी उपाय म्हणजे ऊर्जेचा वापर कमी करणे. आपल्या देशात आजही मोठ्या प्रमाणावर वीज कोळशापासून बनते. कोळसा जाळल्याने प्रचंड CO हवेत सोडला जातो. त्यामुळे घरात LED बल्ब वापरणे, गरज नसताना पंखा, एसी, लाईट बंद करणे, फाईव्ह–स्टार रेटिंगची उपकरणे वापरणे या सवयी लावून घेतल्या पाहिजेत.

एसीचे तापमान २४C किंवा त्यापेक्षा जास्त ठेवले तर वीज बचत होते आणि बिलही कमी येते. एक अंशाने तापमान वाढवले तरी सुमारे ६% वीज वाचते. याचबरोबर शक्य तिथे सौरऊर्जेचा वापर वाढवला पाहिजे. सोसायटीच्या आवारात, मोकळ्या मैदानात, शाळा–कॉलेजच्या परिसरात मियावाकी पद्धतीने दाट जंगले तयार करता येतात. मुंबई महापालिकेनेही हा उपक्रम हाती घेतला आहे. याशिवाय मँग्रोव्ह जंगले समुद्र किनाऱ्याचे रक्षण करतात आणि कार्बन शोषून घेतात. त्यामुळे मँग्रोव्हची तोड थांबवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शहरी भागात 'अर्बन हीट आयलंड' परिणाम कमी करण्यासाठी छतावर पांढरा रंग देणे, टेरेस गार्डन करणे यांसारखे 'कूल रूफ' उपाय तापमान २ ते ४ अंशांनी कमी करू शकतात. आपल्या दैनंदिन सवयींमध्ये बदल करणेही तितकेच आवश्यक आहे. **(साभार इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

### तंत्रज्ञान : आजच्या मानवी जीवनाचा नवा श्वास

सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण तंत्रज्ञानाच्या कुशीतच असतो. सगळीकडे तंत्रज्ञानच आपला पार्टनर आहे. २१व्या शतकात तंत्रज्ञान हे केवळ साधन राहिलं नाही, तर ते जगण्याची पद्धतच बनलं आहे. UPI ने खिशातलं पाकीट गायब केलं. शेतकऱ्याला हवामानाचा अंदाज ॲपवर मिळतो, विद्यार्थी गावात बसून IIT चे लेक्चर ऐकतो.



तंत्रज्ञानाने 'दूरी' हा शब्दच पुसून टाकला. कोविड काळात वर्क फ्रॉम होम, ऑनलाइन शाळा नसती तर जग थांबलं असतं.

**आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील बदल**

पोर्टेबल MRI मशीनमुळे आता गावागावात निदान शक्य होत आहे. टेलिमेडिसिनमुळे मुंबईचा डॉक्टर दुर्गम भागातल्या रुग्णाला तपासतो. रोबोटिक सर्जरीने ऑपरेशनचा धोका कमी झाला. शिक्षणात तर क्रांतीच घडली. डिजिटल क्लासरूम, व्हर्च्युअल लॅब, AI ट्यूटर. गरीब घरातलं मूलही आता कोडिंग शिकून गुगलमध्ये नोकरीचं स्वप्न बघू शकतं.

आर्थिक आणि सामाजिक परिणाम

स्टार्टअप कल्चरमुळे आजचा तरुण नोकरी मागणारा नाही, तर नोकरी देणारा बनतोय. ONDC, UPI, DBT मुळे भ्रष्टाचाराला आळा बसला. शेतमाल थेट ग्राहकापर्यंत पोहोचतोय. पण दुसरी बाजूही आहे–AIमुळे अनेक नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत. डीपफेक, सायबर फ्रॉड, डेटा प्रायव्हसी हे नवे प्रश्न उभे राहिले आहेत. मोबाईलच्या व्यसनाने मानसिक आरोग्यावर परिणाम होतोय.

**भारताची झेप**

डिजिटल इंडियामुळे आज भारत फिनटेकमध्ये जगात नंबर एकवर झाली आहे. चंद्रयान–३, आदित्य–L१ने अवकाशात आपला झेंडा रोवला आहे. सेमीकंडक्टर मिशन, AI मिशनमुळे भारत 'मेक इन इंडिया' ते 'मेक फॉर वर्ल्ड'कडे वाटचाल करीत आहे. ५G नंतर आता ६G वर जोरदारपणे काम सुरू झाले आहे, पण अजूनही ग्रामीण आणि शहरी भागातली डिजिटल दरी ही एक प्रकारचे आव्हानच बनले आहे. पुढची १० वर्षे AI, क्वांटम कॉम्प्युटिंग, बायोटेक आणि ग्रीन हायड्रोजनची असणार आहेत. ड्रायव्हरलेस कार, ह्युमनॉइड रोबोट, मेटाव्हर्स ऑफिस हे स्वप्न राहणार नाही. दरम्यान, तंत्रज्ञान कितीही पुढे गेलं तरी माणूस व माणुसकी केंद्रस्थानी राहिली पाहिजे. कारण शेवटी तंत्रज्ञान हे साधन आहे, साध्य नाही.

## शास्त्रीय गायिका ज्योत्स्ना भोळे

ज्योत्स्ना केशव भोळे एक ज्येष्ठ मराठी रंगभूमी कलाकार आणि हिंदुस्तानी शास्त्रीय गायिका होत्या. पद्मबाई वर्तक यांच्यासोबत त्या १९३३ मध्ये 'आंधळ्याची शाळा' या नाटकात मराठी रंगभूमीवर स्त्री पात्राची भूमिका साकारणाऱ्या पहिल्या महिला अभिनेत्रींपैकी एक होत्या.

संगीतकलानिधी मास्टर कृष्णराव फुलंब्रिकर यांनी संगीतबद्ध केलेल्या 'बोला अमृत बोला' या नाटकातील गाण्यामुळे भोळे लोकप्रिय झाल्या. त्यांना १९७६ मध्ये संगीत नाटक अकादमी, भारताची राष्ट्रीय संगीत, नृत्य आणि नाटक अकादमीद्वारे दिला जाणारा संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आला.



निमित्त

ज्योत्स्ना यांचा जन्म ११ मे १९१४ रोजी गोव्यातील एका छोट्या गावात दुर्गा केळेकर म्हणून झाला. त्या राधाबाई आणि वामन केळेकर यांच्या चौदा भावंडांपैकी एक होत्या. लहानपणापासूनच त्यांचा कल संगीताकडे होता. स्थानिक शाळेत दुसरी इयत्ता पूर्ण केल्यानंतर, त्या वयाच्या आठव्या वर्षी त्यांची मोठी बहीण गिरीजाबाई, जी स्वतः एक गायिका होती, तिच्यासोबत मुंबईला गेल्या. तेव्हा दुर्गा केळेकर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या त्या लॅमिंग्टन रोडवर राहत होत्या आणि चौथीपर्यंत तेथील महानगरपालिकेच्या शाळेत शिकल्या. त्यानंतर, संगीत क्षेत्रात करिअर करणे हे त्यांचे मुख्य ध्येय असल्याने त्यांनी शाळा सोडली. संगीत शिक्षणासाठी मुंबईला जाणे त्यांच्यासाठी एक सुदैवी संधी ठरली.


गिरिजाबाई आग्रा घराण्याचे प्रसिद्ध गायक विलायत हुसेन खान यांच्याकडे प्रशिक्षण घेत असत . ज्योत्स्नाबाईंनी देखील आग्रा घराण्याचे खादिम हुसेन खान यांच्याकडे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. शालेय जीवनातच, मुंबईतील आंतरशालेय गायन स्पर्धा जिंकून त्यांनी स्वतःचे नाव कमावले होते. त्या महिन्यातून तीन–चार वेळा इंडियन ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन रेडिओच्या मुंबई स्टेशनवर गात असत. परिणामी त्या बालगायिका म्हणून बऱ्याच प्रसिद्ध झाल्या.

ज्योत्स्नाबाईंच्या संगीत जीवनात केशवराव यांचे स्थान खूप महत्त्वाचे होते. १९३२ मध्ये त्यांचे लग्न झाले. तेव्हा ज्योत्स्नाबाई फक्त १८ वर्षांच्या होत्या. लग्नानंतर त्यांच्या कलागुणांना बहर येऊ लागला. केशवराव यांचे मांजी खान, रामकृष्णबुवा वाझे, मल्लिकार्जुन मन्सूर आणि मास्टर कृष्णराव यांसारख्या अनेक गायकांशी चांगले संबंध होते. त्यांनी त्यांच्याकडून अनेक बंदिशी गोळा केल्या होत्या. दरम्यान, ज्योत्स्नाबाईंनी आपले कौशल्य अधिक निखारण्यासाठी भेंडीबाजार घराण्यातील गायकांसह अनेक गुरूंकडून प्रशिक्षण आणि शिक्षण घेतले. वेगवेगळ्या घराण्यांच्या वैशिष्ट्यांमुळे त्यांच्या गायनात एक स्वतंत्र आणि प्रभावी ताळमेळ निर्माण झाला.

ज्योत्स्नाबाईंचे रंगमंचावरील पदार्पण त्यांच्या रूप, संगीत आणि अभिनयाच्या संगमामुळे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण होते. त्यांचे नाट्यसंगीत (अभिनय–गायन) संयमित, सुस्पष्ट आणि भेदक होते. नंतर १९४१ मध्ये जेव्हा त्या नाट्यनिकेतनमध्ये सामील झाल्या, तेव्हा त्या एक गायिका–अभिनेत्री म्हणून प्रस्थापित झाल्या. ५ ऑगस्ट २००१ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

**(साभार : इंटरनेट)**


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### आधुनिक जीवनशैली आणि उद्‌भवणारे संभाव्य धोके

आजच्या धावपळीच्या युगात आपली जीवनशैलीच आजारांना आमंत्रण देते. सकाळी उठून घाईघाईने नाश्ता न करता बाहेर पडणं, दिवसभर कॉम्प्युटर स्क्रीनसमोर बसणं, जंक फूडवर ताव मारणं, रात्री उशिरापर्यंत मोबाइल बघत जागणं हे चित्र आता प्रत्येक घरात दिसतं. त्यामुळेच मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार हे आजार तिशीतच दार ठोठावत आहेत. डॉक्टरांच्या मते उन्हाळ्यात उष्णतेचा तडाखा आणि डीहायड्रेशनमुळे हार्ट अॅटॅकचं प्रमाण वाढतंय. लहान मुलांमध्ये लठ्ठपणा, डोळ्यांचे विकार, तरुणांमध्ये चिंता, नैराश्य हे नव्या काळाचे आजार ठरत आहेत.



"जे खाल, तेच व्हाल" हे शंभर टक्के खरं आहे. पिझ्झा, बर्गर, कोल्ड्रिंक्सने पोट भरतं, पण शरीराला पोषण मिळत नाही. आपल्या पारंपरिक आहारातच खरी ताकद आहे. ज्वारी, बाजरी, नाचणी, हिरव्या पालेभाज्या, डाळी, कडधान्ये, मोसमी फळं यांचा रोजच्या जेवणात समावेश करा. आयुर्वेद सांगतं की सकाळचा नाश्ता राजासारखा, दुपारचं जेवण सामान्य माणसासारखं आणि रात्रीचं जेवण भिकाऱ्यासारखं असावं. दिवसाला ३ ते ४ लिटर पाणी प्या. साखर, मीठ, मैदा आणि तळलेले पदार्थ शक्य तितके टाळा. 'स्थानिक आणि हंगामी' अन्न हाच निरोगी राहण्याचा सोपा मंत्र आहे.

शरीर म्हणजे मशीन आहे. ते चालवलं नाही तर गंजतं. दररोज किमान ३० मिनिटं चालणं, योगासने, सूर्यनमस्कार, प्राणायाम याने शरीर आणि मन दोन्ही ताजंतवानं राहतं. ऑफिसमध्ये सलग तासन्तास बसू नका. दर तासाला ५ मिनिटं जागेवरून उठा, स्ट्रेचिंग करा. रात्री १० ते पहाटे ५ ही झोपेची 'गोल्डन अवर' मानली जाते. या वेळेत ७ ते ८ तास शांत झोप घेतली तर दिवसभर उत्साह टिकतो. सकाळच्या कोवळ्या उन्हात १५ मिनिटं थांबल्याने शरीराला नैसर्गिक व्हिटॅमिन D मिळतं.

शरीर सुदृढ असूनही मन अस्वस्थ असेल तर माणूस पूर्णपणे निरोगी म्हणवता येत नाही. कामाचा ताण, स्पर्धा, नातेसंबंधातील तणाव यामुळे अनेकजण नैराश्याचे शिकार होतात. त्यामुळे मन मोकळं करणं गरजेचं आहे. कुटुंबियांशी, मित्रांशी संवाद साधा. छंद जोपासा, संगीत ऐका, पुस्तकं वाचा. ध्यानधारणा केल्याने मन शांत होतं. मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन घेणं किंवा थेरपिस्टकडे जाणं यात कसलीही लाज बाळगू नये. आनंदी राहणं हीदेखील एक कला आहे, ती शिकली पाहिजे.

# राष्ट्रीय लोक अदालतीत सात हजार ७८ प्रकरणे निकाली; २०.५५ कोटींची तडजोड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

दाखलपूर्व व प्रलंबित खटल्यांचा जलद निपटारा व्हावा तसेच सामोपचाराने वाद मिटावेत या उद्देशाने रायगड जिल्ह्यात ९ मे २०२६ रोजी राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली होती. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष राजेंद्र द. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या लोक अदालतीत वादपूर्व व दाखल अशी एकूण ७ हजार ७८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये तब्बल २० कोटी ५५ लाख २० हजार ६१५ रुपयांची तडजोड करण्यात आली.



राष्ट्रीय लोक अदालतीचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र द. सावंत यांच्या हस्ते झाले. यावेळी अलिबाग येथील न्यायिक अधिकारी, वकील संघटनेचे उपाध्यक्ष अनंत पाटील, सचिव अमित देशमुख तसेच जिल्ह्यातील न्यायिक अधिकारी, वकील वर्ग आणि पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या निर्देशानुसार देशभरात राष्ट्रीय लोक अदालत घेण्यात आली. रायगड जिल्ह्यात या लोक अदालतीसाठी २५ हजार ६८१ वादपूर्व आणि १२ हजार १९४ प्रलंबित अशी एकूण ३७ हजार ८७५ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ४ हजार ५९ वादपूर्व आणि ३ हजार १९ प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश व स्तर श्रीमती तेजस्विनी म. निराळे यांनी दिली.एक जोडप्याचा संसार पुन्हा जुळला

लोक अदालतीदरम्यान पाली येथील एका जोडप्याचा कौटुंबिक वाद मिटून त्यांचा संसार पुन्हा सुरळीत झाला. २१ मोटार अपघात प्रकरणांत २.२८ कोटींची नुकसानभरपाई मंजूर

दरम्यान, जिल्ह्यातील २१ मोटार अपघात प्रकरणांत तडजोड होऊन संबंधित पक्षकारांना २ कोटी २८ लाख ६२ हजार रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली.विविध न्यायालयांमध्ये २७ कक्ष स्थापन करण्यात आले होते. काही प्रकरणांमध्ये पक्षकारांना न्यायालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलद्वारेही सुनावणी घेऊन प्रकरणे निकाली काढण्यात आली.

या उपक्रमाला अलिबाग वकील संघटना तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका वकील संघटनांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. लोक अदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी न्यायिक अधिकारी, वकील, न्यायालयीन कर्मचारी, जिल्हा परिषद, रायगड पोलीस प्रशासन आणि सर्व पक्षकारांचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांनी आभार मानले.

## श्रीवर्धन तालुक्यात जिओ मोबाईल सेवेचे नेटवर्क वारंवार गायब; ग्राहकांमधून नाराजी

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरासह संपूर्ण तालुक्यामध्ये जिओ मोबाईल सेवेचे पूर्ण पणे तीन तेरा वाजले आहेत. दिवसातून जिओ मोबाईलची सेवा अनेक वेळा खंडित होत असल्यामुळे ग्राहकांमधून मोठ्या प्रमाणात नाराजीचा सूर पाहायला मिळत आहे. जिओ मोबाईलची सेवा सर्वोत्तम सेवा असल्यामुळे अनेक ग्राहकांनी जिओची सिमकार्ड खरेदी केली आहेत. तर जिओचे नेट देखील ५g चांगल्या प्रमाणात उपलब्ध होत असल्याने बऱ्याच जणांनी आपल्या नेटच्या वापरासाठी देखील जिओ मोबाईलची निवड केलेली आहे. परंतु मागील दोन ते तीन महिन्यापासून जिओ मोबाईलच्या सेवेमध्ये सातत्याने तांत्रिक बिघाड होत असल्याने ग्राहकांमध्ये जिओ मोबाईलच्या खराब सेवेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.



जिओचे नेटवर्क वारंवार गायब होत असल्यामुळे अनेकांचे व्यवहार ठप्प होत आहेत. तर जिओ मोबाईल चे सिम कार्ड वापरणारे सर्वाधिक ग्राहक असल्यामुळे अनेकांना आपल्या कुटुंबियाजवळ किंवा नातेवाईकांजवळ संपर्क साधणे कठीण होऊन बसत आहे. तरी जिओ मोबाईल कंपनीने आपल्या सेवेमध्ये तातडीने सुधारणा न केल्यास ग्राहकांकडून अन्य कंपन्यांमध्ये आपली सिम पोर्ट करण्याचा कल वाढत असल्याचे पाहायला मिळत आहे. श्रीवर्धन तालुक्यातील अनेक नागरिक कामधंद्या निमित्त प्रदेशात राहत असतात. जिओचे मोबाईल नेटवर्क गायब झाल्यामुळे परदेशातून या ठिकाणी संपर्क साधता येत नाही. तर या ठिकाणच्या नातेवाईकांना परदेशात देखील संपर्क साधता येत नाही. त्यामुळे जिओचे सिम वापरणाऱ्या ग्राहकांची मोठ्या प्रमाणात अडचण होत आहे. जिओ मोबाईल कंपनीकडून अशा प्रकारची सुमारसेवा नागरिकांना का मिळत आहे? याबाबत कंपनीकडून खुलासा करण्यात यावा, अशी मागणी ग्राहकांमधून केली जात आहे.

## एसएससी परीक्षेत पेणच्या अनेक शाळांची यशस्वी परंपरा कायम

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या एसएससी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून पेण परिसरातील विविध शाळांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अनेक शाळांनी सलग १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची छाप पाडली आहे.

पेण एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या शाळांच्या निकालात भाळ येथील जी.एन. म्हात्रे विद्यालयाने १०० टक्के निकाल मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. इंग्लिश मीडियम स्कूल, पेणचा ९९.२७ टक्के, एम.एन.नेने कन्या विद्यालयाचा ९८.६२ टक्के, पेण प्रायव्हेट हायस्कूलचा ९४.८३ टक्के, जय किसान विद्या मंदिर, वडखळचा ८३.३३ टक्के तर पू.न. गोडसे विद्यामंदिर, वरसईचा ८२.६१ टक्के निकाल लागला आहे.

पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अ‍ॅड. मंगेश नेने यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालकांचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. दरम्यान, पेण शिक्षण महिला समितीच्या श्रीमती सुमतीबाई वि. देव माध्यमिक विद्यालयाने सलग १५ व्या वर्षी १०० टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.

## मालुक–गणेशनगर घाटात मिनीडोअर उलटली; एक ठार, पाच जण जखमी

**म्हसळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील मालुक–गणेशनगर घाटमार्गावर शनिवारी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात होऊन एकाचा मृत्यू तर पाच जण गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना घडली. मालुक येथून मजगावकडे प्रवासी घेऊन जाणाऱ्या MH–०६–४५०६ या मिनीडोअरचा गणेशनगर येथील तीव्र उताराच्या घाटातील धोकादायक वळणावर अचानक ब्रेक फेल झाला आणि गाडीवरील नियंत्रण सुटून अपघात झाला.



या अपघातात पांडुरंग काप (वय ५०, रा. वाशी हवेली) हे गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय म्हसळा येथे आणण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.अपघातात सीताराम हरीचंद्र जाईलकर (५८), शिल्पा महादेव जाईलकर (५८), हर्षदा हरीचंद्र जाईलकर (४०), समृद्धी सचिन जाईलकर (३९) तसेच मिनीडोअर चालक शहनवाज महमूद वगनाक (४५) हे जखमी झाले असून त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालय म्हसळा येथे उपचार सुरू आहेत. ग्रामीण रुग्णालयातील डॉ. कर्ण, डॉ. अक्षय पवार, अश्विनी जाधव आणि साक्षी जाधव यांनी जखमींवर प्राथमिक उपचार केले.मिळालेल्या माहितीनुसार, जाईलकर कुटुंब मालुक येथील लग्न समारंभ आटोपून मजगावकडे परतत होते. त्यावेळी हा दुर्दैवी अपघात घडला. त्यामुळे लग्न समारंभाचे वातावरण काही क्षणातच शोककळेत बदलले.दरम्यान, मालु कचोरीवलीकासेखोलगणेशनगरमजग ाव– म्हसळा या मार्गावरील एस.टी. सेवा गेल्या पंधरा दिवसांपासून बंद असल्याने नागरिकांना खासगी वाहतुकीचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे अशा धोकादायक प्रवासाला सामोरे जावे लागत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## घरची जबाबदारी सांभाळून जिद्दीच्या जोरावर सुमिता फसाळने मिळवले यश

**पाली : प्रतिनिधी**

परिस्थिती कितीही प्रतिकूल असली आणि संकटांचे डोंगर समोर उभे असले, तरीही प्रबळ इच्छाशक्ती आणि कष्टाच्या जोरावर यशाची शिखरे पादाक्रांत करता येतात, हे पाच्छापूर माध्यमिक विद्यालयातील सुमिता गोविंद फसाळ हिने सिद्ध करून दाखवले आहे. घरची अत्यंत हलाखीची परिस्थिती आणि शारीरिक व्याधींवर मात करत सुमिताने दहावीच्या परीक्षेत ७१.४० टक्के मिळवून उज्ज्वल यश संपादन केल्याने सर्वत्र तिचे कौतुक होत आहे.



सुमिताचे वडील आणि आई दोघेही मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सुमिता ही घरात सर्वात मोठी मुलगी असून तिच्यावर पाच बहिणी आणि एका भावाची जबाबदारी आहे. घरात अठराविश्वे दारिद्र्य असतानाही तिने शिक्षणाची जिद्द सोडली नाही. अभ्यासाचा ताण आणि घरची परिस्थिती यासोबतच सुमिताला हाताला आणि पायाला असलेल्या त्वचारोगाच्या त्रासाचा सामना करावा लागला. अनेकदा शारीरिक वेदना होत असतानाही तिने आपला आत्मविश्वास डगमगू दिला नाही. प्रतिकूल आरोग्याकडे दुर्लक्ष करून तिने सातत्याने अभ्यास सुरू ठेवला आणि आज त्याचे फळ तिला यशाच्या रूपात मिळाले आहे.

सुमिताच्या या यशात तिच्या शाळेचे मोलाचे योगदान आहे. शाळेचे मुख्याध्यापक दीपक माळी, तिचे वर्गशिक्षक आणि इतर सर्व विषय शिक्षकांनी तिला वेळोवेळी मार्गदर्शन आणि शैक्षणिक सहकार्य केले. शिक्षकांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळेच कठीण प्रसंगातही ती अभ्यास करू शकली, असे तिने कृतज्ञतेने नमूद केले.

सुमिताने मिळवलेले यश हे कष्टकरी आणि जिद्दी विद्यार्थ्यांसाठी एक मोठे उदाहरण आहे. एका सामान्य मजुराच्या मुलीने, आजाराशी लढा देत मिळवलेले हे यश दुर्गम भागातील इतर विद्यार्थ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहे. तिच्या पुढील शिक्षणासाठी आमचे सदैव सहकार्य राहील. असे मुख्याध्यापक दीपक माळी यांनी सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत घोसाळकर गरीब परिस्थितीतून पुढे येणाऱ्या अशा होतकरू विद्यार्थिनींमुळे समाजाचा गौरव वाढतो,अशा शब्दात तिचे अभिनंदन करून तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## राजपुरीच्या डॉ. ए.आर.उंड्रे हायस्कूलचा १००% निकाल; रफान बंदेरकर प्रथम

**मुरुड : प्रतिनिधी**

डॉ. ए.आर उंड्रे हायस्कूल राजपुरीचा १००% निकास रफान बेदेरकर मुरुड तालुक्यात प्रथम.दहावीच्या निकालात येदा डॉक्टर ए. उंड्रे हार्मनेश हायस्कूल या शाळेने उज्वले यशाची सुवर्णपरंपरा कायम राखत शंभर टक्के टक्के निकालाची नोंद केली आहे. रफान अहमद मुस्ताक बंदेरकर याने ९३.४० टक्के गुण मिळवत संपूर्ण मुरुड तालूक्यात प्रथम क्रमांक पटकावला

या अभूतपूर्व यशानिमित्त गॅयूल मुज्यूकेशन सोसायटीचे चेअरमन जमीर नझीरी, ट्रस्टी नगमा नझीरी, मुवीन वरखेडे प्रिन्सिपल रिसवाना हुजूक सुपरखासर दिनेश अंगरीकर, शिक्षक वृंद निशा 'हेडुलकर, अ आफ्शा जमादार, सौदिया राऊत, पत्रकार सरफराझ दर्जी तसेच पालक मुश्ताक बेदेकर आठी तहसीन बेदरकर या सर्वांनी त्याचे अभिनंदन केले.

## मोर्बा युनायटेड इंग्लिश स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के; अम्मारा अकलेकर प्रथम

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी शालांत परीक्षेचा निकाल शुक्रवार दि. ८ मे २०२६ रोजी ऑनलाईन जाहीर झाला.

या परीक्षेत माणगाव तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या युनायटेड इंग्लिश स्कुल मोर्बा शाळेने सलग दुसऱ्यावर्षी दहावी परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन करताना या शाळेचा दहावी परीक्षेचा एकूण निकाल १०० टक्के इतका लागला असून कु.अम्मारा म.हनीफ अकलेकर या विद्यार्थिनीने ९१ टक्के इतके गुण संपादन करून शाळेमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

या शाळेमधून कु. अनया राहील गंगरेकर या विद्यार्थिनीने ९०.४० टक्के इतके गुण संपादन करून द्वितीय क्रमांक तर कु.महीन समीर गंगरेकर या विद्यार्थिनीने ८९.६० टक्के इतके गुण संपादन करून तृतीय क्रमांक पटकावत शाळेच्या यशामध्ये मानाचा तुरा रोवला आहे. या शाळेमधून यावर्षी दहावी परीक्षेसाठी एकूण २२ विद्यार्थी बसले होते हे सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये १२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले असून ९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर १ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

या शाळेचा सलग दुसऱ्यावर्षी दहावीचा निकाल नेत्रदीपक लागल्याने पालकवर्गांमधे तसेच विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण आहे. भविष्यात हि शाळा आणखी नावारूपाला येईल अशी आशा मोर्बा विभागातील नागरिकांनी बोलून दाखविली आहे. दहावीत विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केल्याने संस्था पदाधिकारी यांनी शिक्षकांचे अभिनंदन केले.

## विद्या विकास मंदिर विद्यालयात संदीप शर्मा प्रथम

**कर्जत :** कर्जत महिला मंडळ संचलित विद्या विकास मंदिर विद्यालयात कु. संदीप खुबीराम शर्मा याने ८६ . ८० टक्के गुण मिळवीत प्रथम येण्याचा बहुमान मिळविला. या विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. निकाल..प्रथम – कु. संदीप खुबीराम शर्मा ( ८६ . ८० ) द्वितीय – कु. वर्षा बाबू सकपाळ ( ८० . २० ) तृतीय – कु. दीपश्री राकेश म्हात्रे (७६.००) असा आहे.


### सावधान नोटीस

सदर सावधान नोटीसीने तमाम जनतेस असे कळवितो की, आमचे अशिल श्री. विश्वास सदाशिव देशमुख रा. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. यांचे मालकीची वहिवाटीतील खालील वर्णनाची जमिन मिळकत आहे.

**जमिनीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| चिरले | ६४ | ५ | ०–३९–००<br>०–०६–०० | ०.८१ |

सदर जमीन मिळकतीच्या मालकी हक्काकरीता आमचे अशिलांनी कै जयवंत काशिनाथ मढवी यांचेविरुद्ध टेनन्सी अपील नं १५२/२०२६ हा अपील उपविभागीय अधिकारी पनवेल यांचे कोर्टात दाखल केलेला आहे. सदर अपीला मध्ये अपेलन्ट यांनी शपथपत्र व स्थगिती साठी अर्ज देखील दाखल केलेले आहे. सदरचा अपिल प्रलंबित आहे. सदर जमीन मिळकतीचे मुळ मालक श्री विश्वास सदाशिव देशमुख हे आहेत. कै जयवंत काशिनाथ मढवी यांचे वारसदार श्रीमती यमुना जयवंत मढवी वगैरे हे सदरची जमीन मिळकत त्रयस्थ इसमास विक्री करण्याच्या खटपटीत असल्याचे आमचे अशिलांना खात्रीशीर समजलेले आहे.

तरी ह्या नोटीसीने तमाम जनतेस असे कळविण्यात येते की, सदर जमीन मिळकत ही आमचे अशिलांच्या मालकीची ताबेकब्जा वहिवाटीतील जमीन मिळकत असल्याने वरील जमिन मिळकतीत कोणीही कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार करू नये. तसे केल्यास होणाऱ्या परिणामांस संबंधीतास जबाबदार धरणेत येईल. ह्याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे तमाम जनतेसाठी ही सावधान नोटीस दिली.

**दिनांक : ०९–०५–२०२६**
**ठिकाण : पनवेल**

**सही/–**
**अ‍ॅड.एन.बी. घोडविंदे**
**१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स,**
**पनवेल, जि. रायगड**
**मोबाईल – ९५९४१५६३८३**




**मुरूड : खराब हवामानामुळे राजापुरी समुद्रकिनारी कोळी बांधवांनी आपल्या बोटी किनाऱ्यावर ओढल्या आहेत. असेच खराब हवामान राहिले तर पुढील चार महिने बोटी मासळीविना रिकाम्या राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## सर एस.ए. हायस्कूलचा निकाल ९३.२३ टक्के

**मुरुड :** मुरुड शहरात असणारे जंजिरा विद्या मंडळ संचलित सर एस ए हायस्कूल या शाळेचा इयत्ता १० वी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा २०२६ चा एकूण निकाल ९३.२३% एवढा लागला आहे .यामध्ये प्रथम आर्या जितेंद्र म्हामुनकर ८८% द्वितीय अनिश विवेक अपराध ८६%तृतीय सानवी गुंजाळ ८५.४०% यांनी यश संपादन केले. शाळेतील सेमी इंग्रजी निकाल १००% एवढा लागला.शाळेतून दोन्ही माध्यमाचे १३३ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी पैकी १२४ पास (९३.२३%) झाले.कुमारवंशिका आगरकर ८४.६०%मराठी माध्यमातून प्रथम आली.


### जाहीर सूचना

सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, आमचे आशिल श्री मनोज भिकचंद कुचेरिया हे गट क्रमांक १४२/३/अ क्षेत्र ०.१६.०० गुंठे ०.०४.८०, पोटखराबा एकूण क्षेत्र २०.८० गुंठे मौजे कराडेखुर्द, ता. पनवेल, जि. रायगड ही शेतजमिनीची खरेदीचा कारारनामा करत आहेत तरी, सदर शेतजमीन ही, अनंता रामा माळी उर्फ (अनंता गोविंद माळी), वसंत रामा माळी, प्रिया प्रवीण जांभळे, सारिका सुनील पाटील, सचिन विठ्ठल माळी, सुजित विठ्ठल माळी याचा मालकीची ताबे वहिवाटीची व वडिलोपार्जित आहे. सदर शेतजमिनीचे विक्री करण्याचा करार आमचे आशील सोबत करत आहेत.

तरी वरील नमूद जमिनीबाबत कोणत्याही व्यक्तीस हक्क, दावा, गहाण, दान इ. आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा कोणताही दावा ग्राह्य धरला जाणार नाही व पुढील व्यवहार निर्विघ्नपणे पूर्ण करण्यात येईल.

**दिनांक: १०–०५–२०२६**
**ठिकाण: कामोठे**

**सही/–**
**अ‍ॅड. अविनाश गायकवाड**
**मुंबई उच्च न्यायालय**
**मो. नं.: ९७६९११६३२२**

**पत्ता :– शॉप नं ०१, सिटीलाईट सी.एच.एस.लि., प्लॉट नं ५९/ए, सेक्टर २१, कामोठे, नवी मुंबई**

# आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याकडून मोरबे धरण प्रकल्प क्षेत्राची पाहणी

## जलाशयाच्या बाजूने घातले जाणार कुंपण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या स्वतःच्या मालकीच्या मोरबे धरण प्रकल्पातून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रास पाणीपुरवठा केला जात असून हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार यावर्षी 'एल-निनो' या जागतिक हवामान बदलामुळे भारतातील मोसमी वाऱ्यावर परिणाम होऊन सरासरी पावसाचे प्रमाण ९२% ते ९४% इतके राहणार आहे तसेच पावसाळाही उशिरा सुरू होणार असल्याचे अंदाज वर्तविण्यात आले आहेत. या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी मोरबे धरण प्रकल्पस्थळी भेट देऊन जलसाठ्याची प्रत्यक्ष स्थिती जाणून घेतली.



जलाशयाच्या दोन्ही बाजूने संपूर्ण परिसराची पाहणी करीत जमिनीची मोजणी व सीमांकन निश्चित करून आवश्यक त्या ठिकाणी तत्परतेने कुंपण घालण्याचे निर्देश दिले. यावेळी आयुक्तांसमवेत अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, मालमत्ता विभागाचे उपायुक्त भागवत डोईफोडे, अतिक्रमण विभागाचे उपायुक्त संजय शिंदे, उद्यान विभाग उपायुक्त स्मिता काळे, कार्यकारी अभियंता संतोष उनवणे आणि संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मोरबे धरण क्षेत्रात अजून ८५ दिवस पुरेल एवढा पाणीसाठा आहे. यावर्षी पर्जन्यमान नेहमीपेक्षा ६ ते ८ टक्के कमी असेल. ही परिस्थिती लक्षात घेता नवी मुंबईकर नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन आयुक्तांनी केले. पावसाच्या स्थितीचा विचार करून महापालिका पदाधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर पाणीपुरवठ्याच्या नियोजनाबाबत निर्णय घ्यावे लागतील, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

या पाहणी दौऱ्यात आयुक्तांनी धरण क्षेत्राच्या एका बाजूने आंबेवाडीपर्यंत ७.५ किमी तसेच दुसऱ्या बाजूने पिरकटवाडी, उंबरणेवाडीपर्यंत ११ किमी अशी धरणाच्या दोन्ही बाजूने क्षेत्रपाहणी केली. यावेळी धरण क्षेत्राच्या बाहेर लगतच्या भागात आढळलेल्या काही खासगी बांधकामांच्या अनुषंगाने हद्द तपासणी करावी, असे त्यांनी सूचित केले. त्याप्रमाणे रायगड जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मोजणीचे काम तातडीने करून घेण्याचे निर्देश दिले. त्यासोबतच आवश्यक त्या ठिकाणी कुंपण घालण्याच्याही सूचना आयुक्तांनी केल्या.

परिसरातील वृक्षारोपणास योग्य भागात देशी वृक्षांची झाडे लावून पर्यावरण संवर्धनाची कार्यवाही करावी, असे सूचित करतानाच आयुक्तांनी सभोवतालच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबवावी, असे निर्देश दिले. धरणाच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या व त्यावेळी पुनर्वसनास नकार दिलेल्या पिरकटवाडी व ३ वाड्यांमधील कुटुंबांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने तसेच त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने तपासणी करावी, असेही निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले.

# अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या परप्रांतीयास बेड्या

## ■ उरण पोलिसांची कारवाई

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील पागोटे येथील दशमीस खालसा ढाब्यासमोर डीआरटी पुलाजवळ रिलायन्स रोडवर ८ मे रोजी सायंकाळी ५.११ वाजता गांजा हा अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या परप्रांतीय आरोपी इसम मनिरुल अयनुल हक (३९) याला उरण पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. त्यामुळे उरण तालुक्यात मोठी खळबळ माजली आहे.

आरोपी मनिरुल हक हा बाहेरून गांजा घेऊन येणार असल्याची खबर मिळाली होती. त्यामुळे उरण पोलिसांनी आरोपीला पागोटे हद्दीतील रिलायन्स रोडवर रंगेहाथ पकडले असता त्याच्याकडे प्लास्टिक पिशवीत २ लाख ७८ हजार रुपये किमतीचा २ किलो ७८० ग्रॅम वजनाचा हिरवट तपकिरी रंगाचा तीव्र उग्र वास असलेला पाने, फुले, बिया व काड्यामिश्रित पदार्थ असे संलग्न मिश्रण असलेला ओलसर गांजा बेकायदेशीरपणे स्वतः जवळ बाळगलेला आढळून आला.

आरोपी हा नवी मुंबई वाशी येथील एपीएमसी मार्केट येथील कांदा, बटाटा विक्री करणारा इसम असून, एकता नगर झोपडपट्टी, पुनीत कॉर्नर सेक्टर - २६, एपीएमसी वाशी, नवी



मुंबई येथे राहतो. आरोपीला उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनिफ मुलाणी यांच्या अधिपत्याखाली उरण पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश खांदवे, पोलीस उपनिरीक्षक गोविंद केंद्रे व पोलीस उपनिरीक्षक संजय राठोड यांच्या पोलीस पथकाने सापळा रचून आरोपीची तपासणी केली असता त्याच्याजवळ प्लास्टिक पिशवीत गांजा सापडला. त्याला अटक करून उरणच्या कनिष्ठ स्तर न्यायालयासमोर हजर केले असता १३ मेपर्यंत ५ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. उरण पोलिसांच्या या धाडसी कारवाईमुळे समाधान व्यक्त होत आहे. तर विविध ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे अमली पदार्थ विकणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# एनएमएमटीच्या बसफेऱ्या वाढवा!

## परिवहन सदस्य राजेश राय यांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

एमआयडीसी परिसरात दररोज हजारो कर्मचारी आणि नागरिक प्रवास करत असताना अपुऱ्या बससेवेमुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः सकाळी कामावर जाताना आणि संध्याकाळी घरी परतताना बससाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर एनएमएमटीच्या बसफेऱ्या वाढविण्याची मागणी भाजपचे परिवहन समिती सदस्य राजेश राय यांनी केली आहे.



परिवहन समितीच्या बैठकीत त्यांनी एमआयडीसी भागातील प्रवाशांच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. अपुऱ्या बससेवेमुळे नागरिकांना रिक्षांवर अवलंबून राहावे लागत असून त्याचा आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत असल्याचे राय यांनी सांगितले. राजेश राय यांनी बैठकीत सांगितले की, परिवहन सेवेसाठी नवीन बसेस खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू असून, त्या उपलब्ध झाल्यानंतर एमआयडीसी परिसरातील फेऱ्या वाढविण्यावर भर दिला जाईल. त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

याचबरोबर सिडकोकडून परिवहन सेवेसाठी आवश्यक भूखंड हस्तांतरित करण्याचा मुद्दाही बैठकीत उपस्थित करण्यात आला. सानपाडा आणि महापे परिसरातील भूखंड हस्तांतरण प्रलंबित असल्याचे सांगत हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्याची मागणी राय यांच्यातर्फे करण्यात आली आहे.

# उरणमध्ये नागरी संरक्षण दलातर्फे प्राथमिक पाठ्यक्रम प्रशिक्षण

**उरण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन गृह विभाग विशेष नागरी संरक्षण दल उरण रायगड यांच्या वतीने नागरी संरक्षण प्राथमिक पाठ्यक्रम प्रशिक्षण उपनियंत्रक केंद्र बोरी उरण येथे आयोजित करण्यात आले होते. यात प्रशिक्षणाचे विषय नागरी संरक्षण दलाची आवश्यकता, उद्देश, उपाययोजना, आपत्ती व्यवस्थापन, अग्निशमन, प्रथमोपचार, नियंत्रण व संदेशवहन, अडकलेल्या नागरिकांची सुटका, विमोचन, सीपीआर पध्दत, कृत्रिम श्वसन पध्दती, रुग्णास वाहून नेण्याच्या पध्दती, बॅन्डेज, दोऱ्या व गाठींचे प्रकार आदींबाबत माहिती तसेच प्रात्यक्षिकेसहित प्रक्षिशण वर्ग



घेण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना शासनाचे ओळखपत्र, शासकीय प्रशिक्षण प्रमाणपत्र, देशसेवेची अमूल्य संधी, विभागाचे नेतृत्व करण्याची संधी, नागरी संरक्षण स्वयंसेवक सभासदत्व मिळणार आहे.

प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नवीन राजपाल (मुख्य क्षेत्ररक्षक) यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. शशिकांत शिरसाठ (सहाय्यक उपनियंत्रक), तसेच वरिष्ठ स्वयंसेवक सलिम शेख, दौलत पाटील, निषाद मोकल, आयुष मोहिते, समीक्षा ठाकूर, प्रणाली सकपाळ, मानसी ठाकूर, वैदेही गावंड, रेशम कोळी, भूमी मोकल, उत्कर्षा गावंड, परमिन खान उपस्थित होते. लीडर आफ्रिन खान हिने मनोगत व्यक्त केले.

रेश्मा खान हिने आपत्तीदरम्यान जीवितहानी, वित्तहानी कशी कमी करायची याबाबत प्रशिक्षणामध्ये प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन मिळाले याबाबत आनंद व्यक्त केला. मुलांमधून लीडर म्हणून इंगोले यांनी जबाबदारी पार पाडली, तर राजगे यांनी मनोगत व्यक्त केले तसेच क्लासमधून प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला आहे.

जयेश पाटीलने द्वितीय क्रमांक पटकवला तर तृतीय क्रमांक हा आकाश मोरे आणि आकाश भिडे यांनी मिळवला आहे, सदर पाठ्यक्रम राबवण्यासाठी हरेश्वर ठाकूर (विभागीय क्षेत्ररक्षक/मानसेवी निर्देशक) यांनी मोठी मेहनत घेतली होती तसेच आभार प्रदर्शन करताना देशसेवा करण्यासाठी ही आपली पहिली पायरी आहे. आपण प्रक्षिशण कर्तव्य जबाबदारीने पार पाडावे. संकट कोणतेही सांगून येत नाही. दक्षता आपली व्यर्थ जात नाही. नागरिक ही करेंगे नागरिको की रक्षा, असा संदेश देऊन व्यासपीठावरील उपस्थित मान्यवर आणि सहभागी झालेले स्वयंसेवकांना शुभेच्छा देऊन मान्यवरांच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता झाली.

# नवी मुंबईचा दहावीचा निकाल ९६.२७ टक्के

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षेचा निकाल शुक्रवारी दुपारी ऑनलाईन जाहीर करण्यात आला. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राचा एकूण निकाल ९६.२७ टक्के लागला असून यंदाही मुलींनी गुणवत्तेत बाजी मारत आपले वर्चस्व कायम ठेवले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातून यंदा एकूण १५ हजार ३०५ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी अर्ज केला होता. त्यापैकी १५ हजार २६७ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला बसले होते. यामधून १४ हजार ६९८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गेल्या काही वर्षांप्रमाणे यंदाही नवी मुंबईचा निकाल राज्याच्या सरासरीपेक्षा अधिक लागल्याने विद्यार्थ्यांसह पालक आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. निकालात मुलींनी पुन्हा एकदा आपली सरस कामगिरी सिद्ध केली आहे. नवी मुंबईत मुलींचा निकाल ९७.३५ टक्के इतका लागला असून मुलांचा निकाल ९५.२८ टक्के नोंदविण्यात आला आहे. मुलींच्या सातत्यपूर्ण यशामुळे शिक्षण क्षेत्रात त्यांची प्रगती अधोरेखित झाली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनीदेखील यंदाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविल्याने शिक्षक व पालकांकडून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

# गव्हाण विद्यालयात कर्मवीर पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील गरीब, दीनदुबळ्या दलित बहुजन समाजाला शिक्षित करण्यासाठी अवघे आयुष्य समर्पित करणारे महान कर्मयोगी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक थोर शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले. एसएससी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये विद्यालयातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली विद्यार्थिनी प्रसाद रेणू प्रदीपकुमार हिच्या शुभहस्ते पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील हे महाराष्ट्रातील बहुजनांच्या



शैक्षणिक पुनरत्थानाचे प्रणेते असल्याचे प्रतिपादन करून अण्णांच्या कार्याचा गौरव केला. विद्यालयाचे कलाशिक्षक गणेश भोईर यांनी कर्मवीर अण्णा म्हणजे समस्त रयतेचे दैवत असल्याचे प्रतिपादन यावेळी केले.

यावेळी ज्युनिअर कॉलेजचे माणिक घरत, अर्चना पाटील, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, कलाशिक्षक गणेश भोईर, लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे, विद्यालयाचे सेवक जनार्दन खैरे, धनाजी ठाकूर, दयानंद खारकर, अरुण कोळी तसेच विद्यार्थिनी रेणू प्रसाद, सही घोलप आदी उपस्थित होते.

# अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरळीत पूर्ण करावी

## भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी इयत्ता ११वी प्रवेश प्रक्रिया सुरळीत व वेळेत पूर्ण करावी, अशी मागणी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ई-मेलद्वारे केली आहे.

डॉ. पाटील यांनी पाठविलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, यंदाही इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तसेच प्रवेश प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडली जात आहे. मात्र, प्रवेश फेऱ्या वेळेत न झाल्यास विद्यार्थ्यांना आणि पालकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

विशेषतः प्रत्येक प्रवेश फेरीनंतर विद्यार्थ्यांना शाळा-कॉलेजमध्ये प्रत्यक्ष जाऊन कागदपत्र पडताळणी करावी लागत असल्याने पालकांना वारंवार रजा घ्यावी लागते. यामुळे आर्थिक व मानसिक ताण वाढत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच प्रवेश प्रक्रिया लांबल्यास विद्यार्थ्यांचे नियमित शैक्षणिक सत्र उशिरा सुरू होते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होण्याची शक्यता असून शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.

राज्यभरातील सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमधील प्रवेश प्रक्रिया निश्चित कालावधीत पूर्ण करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, अशी मागणीही त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# जे. एम. म्हात्रे चॅरिटेबलच्या शाळांचा १०० टक्के निकाल



**पनवेल : प्रतिनिधी**

जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था संचलित हिमांशू दिलीप पाटील इंग्लिश मिडियम स्कूल, न्यू इंग्लिश मिडियम स्कूल तसेच पदाजी पांडुरंग मुंबईकर इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज या तिन्ही विद्यालयांचा इयत्ता दहावीचा निकाल अत्यंत उल्लेखनीय लागला असून तिन्ही शाळांनी १०० टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.

शहरांप्रमाणेच आधुनिक शिक्षणाच्या संधी गावागावात पोहोचाव्यात या दूरदृष्टीतून संस्थेचे संस्थापक जे. एम. म्हात्रे यांच्या विचारातून या शाळांची निर्मिती करण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचा संस्थेचा संकल्प यशस्वीपणे पुढे नेला जात असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. तिन्ही विद्यालयांतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक वृंद, पालक व नागरिकांकडून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हिमांशू दिलीप पाटील इंग्लिश मिडियममधील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. श्वेता पटेल ८९ टक्के, कु. महिमा गावडे ८९ टक्के, कु. रुद्राणी पाटील ८९ टक्के यांनी संयुक्तरीत्या प्रथम क्रमांक पटकावला. प्रिन्स कुमार दिनेश मंडल ८२.६० टक्के, रश्मित कांबळे ८२ टक्के या विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले. न्यू इंग्लिश मिडियम स्कूलमधील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. रिया शेस्त्री ८२.२० टक्के, आदित्य भारतीय ७९ टक्के, कु. तृष्णा नेवरेकर ७५ टक्के या विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केले.

तसेच पदाजी पांडुरंग मुंबईकर इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमधील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. प्राजक्ता ठाकूर ८९.४० टक्के, मास्टर शौर्य पाटील ८९.२० टक्के, कु. गीतिका पाटील ८८.४० टक्के या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाचा नावलौकिक वाढवला. विद्यालयांच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्याच्या जोरावर हे यश मिळविले आहे.

# रसायनी एचओसी इंटरनॅशनल कॉलेजची दिक्षा गायकर प्रथम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेत मोहोपाडा आळी आंबिवली



येथील एचओसी इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेजची वाणिज्य शाखेतून दिक्षा सुप्रिया रविंद्रनाथ गायकर हि ८८.१७ टक्के गुण मिळवून रसायनी पाताळगंगा विभागातून पहिली तर ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स विषयात १०० पैकी ९७ गुण मिळवून खालापूर तालुक्यातून पहिली आली आहे.

ज्युनिअर कॉलेजच्या वाणिज्य शाखेचा निकाल ९८ टक्के लागला. एचओसी इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमधून दिक्षा ८८.१७ टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे. दिक्षाने सुयश संपादन केल्याने मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व रसायनीकरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# रबाळे, ऐरोली, घणसोलीकरांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रतिनिधींची आढावा बैठक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी रबाळे पोलीस स्टेशनच्या वार्षिक निरीक्षणादरम्यान रबाळे, ऐरोली व घणसोली परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, लोकप्रतिनिधी व नगरसेवकांची विशेष बैठक आयोजित करून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच त्या समस्यांवर प्रभावी उपाययोजना कशा प्रकारे करता येतील याबाबत सविस्तर विचारविनिमयही केला.

या बैठकीमध्ये नागरिकांनी रबाळे, ऐरोली व घणसोली परिसरामध्ये वाढत असलेल्या अमली पदार्थ विक्री व सेवन करणाऱ्या इसमांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच ऐरोली व घणसोली परिसरात नवीन पोलीस बीट चौक्या सुरू करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. परिसरातील कायदा -सुव्यवस्था, वाहतूक, सुरक्षाविषयक उपाययोजना व नागरिकांच्या दैनंदिन अडचणींबाबतही विविध प्रश्न उपस्थित करण्यात आले.



पोलीस आयुक्तांनी नागरिकांना नवीन बी.एन.एस. कायद्याबाबत माहिती दिली तसेच अमली पदार्थविरोधी कारवाई, सायबर गुन्हे प्रतिबंधक उपाययोजना व नवी मुंबई पोलिसांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती नागरिकांसमोर मांडली. यावेळी नागरिकांनी पोलिसांकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत समाधान व्यक्त केले. वाढते गुन्हे व इतर समस्यांच्या अनुषंगाने परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणा अधिक मजबूत व पोलिसांना तपासकामात उपयुक्त ठरेल अशा स्वरूपात उभारण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील, असे स्थानिक नगरसेवकांनी बैठकीत सांगितले.

या बैठकीस शिवसेना गटनेते नगरसेवक मनोज हळदणकर, नगरसेवक बंडू केनी, राजेश मडवी, अंकुश सोनवणे, आकाश मडवी, साहिल चोगुले, अनिकेत म्हात्रे, वैशाली रेवेंद्र पाटील, पूजा राजू पाटील, ऐश्वर्या अंकुश सोनवणे, हेमांगी अंकुश सोनवणे, श्रेया सुदर्शन जिरगे, समाजसेविका संध्या सावंत, मीनाक्षी दांगट, डॉ. शिल्पा केशवाणी, डॉ. निशिकांत बर्फे, डॉ. सचिन पाटील, समाजसेवक सुधीर कुमठेकर, गगनदीप कोहली तसेच रबाळे, घणसोली व ऐरोली परिसरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलीस आयुक्तांनी नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून त्या सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन दिले.

# माणगावात वादळी पावसाचे थैमान

## वीजपुरवठा खंडित, बाजारपेठ ठप्प, भात व आंबा पिकांचे नुकसान

**माणगाव : प्रतिनिधी**

गेल्या आठ दिवसांपासून उष्णतेच्या तडाख्याने होरपळलेल्या माणगाव तालुक्यावर शनिवारी दुपारी अचानक वादळी पावसाने आसूड ओढले. दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास आकाशात काळ्या ढगांनी गर्दी करताच क्षणार्धात संपूर्ण परिसरात वादळी पाऊस कोसळला. विजेच्या कडकडाटासह थैमान घालणाऱ्या या अवकाळी पावसाने तब्बल दीड तास तालुक्याला झोडपून काढले. या अनपेक्षित संकटाने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले, तर संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले.



वादळी पावसाच्या तडाख्यात वीजपुरवठा दरम्यानच्या काळात खंडित झाला. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय झाली. अचानक आलेल्या या संकटाने सर्वसामान्य नागरिकांची पूर्णपणे धांदल उडाली. तालुक्यातील प्रमुख बाजार पेठही या पावसामुळे ठप्प झाली. व्यापारी व ग्राहक दोघेही आडोसा शोधत पांगले. दुकाने, हातगाड्या व उघड्यावरील व्यवसायांचेही नुकसान झाले. वादळी पावसामुळे तालुक्यात नेमके किती नुकसान झाले याची सविस्तर माहिती मात्र उशिरा पर्यंत प्रशासनाकडे उपलब्ध झाली नव्हती. विशेष म्हणजे हा पाऊस केवळ शनिवारपुरताच मर्यादित नव्हता. माणगाव तालुक्यातील वेगवेगळ्या भागांमध्ये गेल्या दोन दिवसांपासून या अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. सलग पावसाच्या तडाख्याने तालुक्यातील नागरिक आणि शेतकरी दोघेही चिंताग्रस्त झाले आहेत.

शेतकऱ्यांवर दुहेरी संकट; भात व आंबा पिकांचे नुकसान या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका बसला तो तालुक्यातील शेतकरी वर्गाला पावसाळा जवळ येऊन ठेपल्याने रब्बी हंगामातील भात पीक अजूनही तालुक्याच्या विविध भागांत शेतात उभे आहे. वादळी पावसाच्या तडाख्याने काही ठिकाणी हे उभे भात पीक जमीनदोस्त होऊन मोठे नुकसान झाले आहे. त्यातच आधीच कर्जाच्या ओझ्या खाली दबलेला आणि मेटाकुटीला आलेला शेतकरी या संकटाने पुन्हा एकदा उद्ध्वस्त झाला आहे. एवढ्यावरच न थांबता, हंगामाच्या अखेरीस उरलेल्या आंबा पिकाचेही या वादळी पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे आंबा बागायतदार शेतकरीही मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला असून, या दुहेरी संकटाने शेतकरी वर्ग पूर्णपणे हवालदिल झाला आहे. प्रशासनाने नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत शेतकऱ्यांची मागणी संकटग्रस्त शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने नुकसानीचे पंचनामे करून भरपाई देण्याची मागणी केली आहे. निसर्गाच्या लहरीपणाने वारंवार होणाऱ्या नुकसानी मुळे त्रस्त शेतकऱ्यांना शासनाने तातडीने दिलासा द्यावा, अशी अपेक्षा तालुक्यातून व्यक्त होत आहे.

हवामानातील बेभरवशाच्या बदलांनी कोकणातील शेतकऱ्याचे कंबरडे मोडले असताना, या बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायला हवे.

# खालापुरातील चार गावे आणि १३ वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्राम पंचायत खरीवली ही देशात जल समृद्ध ग्राम पंचायत म्हणून ओळखली जाते, पण तालुक्यातील चार गावे आणि तेरा वाड्या भीषण पाणी टंचाईने त्रस्त झालेल्या आहेत. उपाय म्हणून टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे.

सद्या कडक उन्हाचा तडाखा बसत असुन दिवसेंदिवस उष्मा वाढत चालला आहे, आणि अशा परिस्थितीत पाणी टंचाई निर्माण झाल्यास तेथील लोकांचे किती हाल होत असतील? वर्षानुवर्ष टँकर, बैलगाडी यांनी पाणी पुरवठा करणे म्हणजे लोकप्रतिनिधी यांना हे भूषणावह आहे का? स्थानिक पातळीवर ते देशाच्या संसदेत असणारे लोक प्रतिनिधी काय करतात? त्यांचा प्रशासनावर दबाव आहे की प्रशासनातील अधिकारी यांच्याशी नुसती बैठक होते? असा सामान्य जनतेला पडलेला प्रश्न आहे. खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत खरीवली ही देशात जल समृद्ध ग्राम पंचायत म्हणून नावारूपाला आली आहे. आणि त्याच खालापूर तालुक्यात चार गावे आणि तेरा वाड्या भीषण पाणी टंचाईने त्रस्त आहेत.

हे वास्तव भयानक आहे. खर तर खालापूर तालुक्यात तीन धरणे, एक वळण बंधारा आणि नव्या मुंबईला पाणी पुरवठा करणारे मोरबे धरण, आणि वर्षाच्या बारा महिने वाहणारी पाताळगंगा नदी असताना अशी पाणी टंचाई निर्माण होणे, हेच तालुक्याचे दुर्भाग्य आहे.

मनोरंजन करणारे प्रकल्प आणि उभी राहणारी खाजगी शहरे यांना कसा पाणी पुरवठा होईल? याकडे बारकाईने लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाचे लक्ष लागले आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. वावोशी, बीड खुर्द, केळवली आणि जांबरुंग ही चार गावे तर तळवली दांडवाडी, माणिकनगर तळवली कातकरवाडी, रानसई आदिवासी वाडी, ढेबेवाडी बर्गेवाडी, बीड खुर्द आदिवासी वाडी, बीड खुर्द बौद्धवाडा, केळवली आदिवासी वाडी, उंबरविरा ठाकूरवाडी आणि जांबरंग बौध्दवाडी या तेरा वाड्या पाणी टंचाईने ग्रासले आहे.जांबरुंग धरणाचा प्रश्न सुटला असता तर बऱ्यापैकी त्या परिसराची पाणी टंचाई दूर झाली असती.ढेबेवाडी, बर्गेवाडी रानसई आदिवासी वाडी हा भाग दुर्गम असून पाण्याचा स्रोत शोधून उपाययोजना करण्याची गरज असून ग्राम पंचायत शिरवली ही माझी वसुंधरा अभियानात राज्यात प्रथम आलेली ग्रामपंचायत आहे.

# तन्वी कयापाकला दहावीत ९४.४० टक्के गुण; भाजप नेत्या यशोधरा गोडबोलेंनी केले अभिनंदन

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रातील अग्रगण्य संस्थांपैकी एक ओळखल्या जाणाऱ्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचालित गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यम शाळेची विद्यार्थिनी कु.तन्वी धम्मपाल कयापाक या विद्यार्थिनीने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या १०वी शालांत परीक्षेत ९४.४० टक्के इतके गुण संपादन करून शाळेत सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकावला. या उज्वल यशाबद्दल भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा सचिव यशोधरा गोडबोले यांनी तन्वीच्या आदर्श समतानगर माणगाव येथील निवासस्थानी जाऊन तन्वीचे



पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी तन्वीचे आई – वडील व भाऊ उपस्थित होते.

कु.तन्वी हिचे वडील धम्मपाल कयापाक हे पोलीस खात्यात नोकरीला आहेत. तन्वी हि लहानपणापासूनच बुद्धीने अत्यंत तल्लक आहे. तिचे पहिली ते नववी पर्यंतचे शिक्षण हिंगोली गावी झाले. त्यानंतर तिच्या वडिलांची बदली झाल्यावर दहावीचे शिक्षण तिने रायगड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रातील अग्रगण्य संस्थांपैकी एक ओळखल्या जाणाऱ्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचालित गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यम शाळेत घेतले. याठिकाणी दहावीला प्रवेश घेतल्यावर तिने अथक परिश्रम घेत जिद्द,चिकाटी धरून दहावीचा अभ्यास केला. विशेष म्हणजे तिने कोणतेही खाजगी क्लास न लावता ऑनलाईन क्लासवर अभ्यास केला. प्रचंड मेहनतीच्या जोरावर तिने दहावीत उज्वल यश संपादन करताना ९४.४० टक्के गुण संपादन करून शाळेत प्रथम क्रमांकांनी उत्तीर्ण झाली. आपल्या या उज्वल यशाबद्दल प्रसार माध्यमांजवळ बोलताना तन्वीने सांगितले कि,माझ्या या यशात माझ्या शाळेतील सर्व शिक्षकवर्ग तसेच आई–वडील यांचेही मोठे योगदान राहिले आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन तसेच आई – वडिलांनी माझ्यासाठी घेतलेली मेहनत महत्वाची ठरली. यापुढे मी नांदेड येथे अकरावी विज्ञान शाखेत प्रवेश घेणार असून पुढे बारावी झाल्यावर नीटची परीक्षा देऊन मला डॉक्टर होण्याची इच्छा असल्याचे तिने सांगितले. तन्वीच्या या यशाबद्दल तिचे माणगाव तालुक्यातून सर्व स्तरांतून विशेष अभिनंदन व कौतुक होत आहे.

# एसएससी परीक्षेत शिघ्रे गावच्या विद्यार्थिनी अव्वल

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड–जंजिरा येथील अंजुमन इस्लाम जंजिरा ॲग्री. हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ने मार्च २०२६ मध्ये झालेल्या एसएससी परीक्षेत शिघ्रे गावच्या विद्यार्थिनींचे घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिघ्रे गावामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थिनी तुबा सज्जाद मोझर हिने ९०.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तसेच आमना राहिद पठाण हिने ८९.६० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला, तर फातिमा इश्तियाक शिघ्रेकर हिने ८९.४० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला. अंजुमनच्या इतिहासात प्रथमच अशी अभिमानास्पद घटना घडली असून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक एकाच गावातील विद्यार्थिनींनी पटकावले आहेत.



या उल्लेखनीय यशानिमित्त शिघ्रे गावच्या मुस्लिम समाजाचे अध्यक्ष अब्दुल करीम सबणसकर, उपाध्यक्ष हबीबुर्रहमान इद्रूस तसेच कमिटी सदस्य फजल महमूद जमादार, हिफजुर्रहमान कबले, अंजुमन इस्लाम जंजिराचे सदस्य व शिघ्रे गावचे समाजसेवक तौसिफ फत्ते आदी मान्यवरांनी विद्यार्थिनींचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिघ्रे मुस्लिम समाजाचे अध्यक्ष अब्दुल करीम सबणसकर यांनी अंजुमन इस्लाम जंजिरा चे पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती चेअरमन, प्राचार्य सर्व शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण घडणीत दिलेल्या योगदानाबद्दल आभार व्यक्त केले.

# पूर्वा भोसलेला ९५ टक्के गुण

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील चिंचवलीवाडी गावची पूर्वा चंद्रकांत भोसले हिने इयत्ता दहावीच्या परीक्षेत तब्बल ९५ टक्के गुण मिळवत उज्वल यश संपादन केले आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे चिंचवली गावासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पूर्वा ही अभ्यासू, मेहनती व जिद्दी विद्यार्थिनी असून तिने सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश प्राप्त केले. तिचे वडील चंद्रकांत गोविंद भोसले ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच तसेच माजी अध्यक्ष असून सध्या नोकरी व्यवसायात कार्यरत आहेत, तर आई ज्योत्स्ना भोसले या गृहिणी आहेत.

# कोएसो 'लिटिल एंजेल्स'चा दहावीचा निकाल ९८.६३ टक्के

**पेण : प्रतिनिधी**

को. ए. सो. लिटिल एंजल्स इंग्लिश मेडियम स्कुलने ९८.६३ % निकाल घेऊन चांगल्या निकालाची परंपरा कायम राखली आहे. यामध्ये डिक्टेशन ५७% विद्यार्थ्यांना मिळाला. फर्स्ट क्लास ५८ विद्यार्थ्यांनी घेतला व सेकंड क्लास २६ विद्यार्थ्यांनी घेतला व थर्ड क्लास तीन विद्यार्थी अथर्व महेश म्हात्रे ९५.८० % , चैतन्य गजानन महाडिक ९४.४० %, निधी प्रसाद अडसुळे ९४.२० %, आर्या अभिजीत काळोखे ९१.८०%, चैत्राली गिरीश म्हात्रे ९१.२०%, मयूर डोंगरे ९१% या विद्यार्थ्यांनी चांगली टक्केवारी घेऊन हायस्कूलची शान वाढवली आहे. या हायस्कूलमध्ये अनेक ग्रामीण भागातले विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षकांची मेहनत, जादा तासिका, आदर्श अध्यापन पद्धती व विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्या मधला समन्वय यामुळे अनेक वर्षापासून आपली निकालाची परंपरा राखली आहे. त्याबद्दल हायस्कूलच्या अध्यक्षा मेरी पिंक मॅडम, कमिटी सदस्य ह.भ.प. कृष्णा वर्तक सर, चंद्रकांत म्हात्रे सर यांनी सेकंडरी मुख्याध्यापिका तृप्ती विलास वनगे, प्रभारी मुख्याध्यापिका प्रीती संदीप म्हात्रे सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थ्यांचे व पालक वर्गाचे अभिनंदन केले.

# गारमाळ रस्त्यावर आरएमसीचा माल; अपघाताची शक्यता

**खालापूर** : मुंबई–पुणे जुन्या महामार्गावरील दस्तुरी येथील गारमाळच्या रोडवर अवघड वळणावर काँक्रिटीकरणचा (आरएमसीचा ) माल पडल्याने त्या मालावरून दुचाकी घसरून अपघात होण्याची दाट शक्यता असून कंपनीवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. घाटमाथ्यावर गारमाळ येथे बंगले बांधण्याचे काम चालू आहे. त्या बंगल्यांसाठी लोणावळा येथून आरएमसीच्या मिक्सरच्या गाड्यामधून



काँक्रिटीकरणचा माल घेऊन येत असून त्या दस्तुरी येथील अवघड वळणावर आल्याने चढणीवर त्यातील माल रस्त्यावर पडत असल्याच्या घटना घडत आहेत.

# खोपोलीत एकवेळ, पण मुबलक पाणी पुरवठा होणार –उपनगराध्यक्ष विक्रम साबळे

**खोपोली : प्रतिनिधी**

पाणीदार शहर अशी ओळख असलेल्या खोपोली शहरात दि ११ पासून पुढील माहिती प्राप्त होईपर्यंत एकवेळ पाणीपुरवठा केला जाणार आहे. दोन टप्प्यात हा पाणीपुरवठा होणार असून, या नुसार काही भागात सकाळी ६.१५ ते ८.१५ व सायंकाळी ६.०० ते ९.०० असा हा पाणीपुरवठा केला जाणार आहे. अशी माहिती पाणीपुरवठा सभापती व उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी प्रसार माध्यमांची माहिती देताना सांगितले. एक वेळ पाणीपुरवठा केल्याने पाण्याला प्रेशर असल्याने आणि समस्या यामुळे मिटणार असल्याचे पण त्यांनी सांगितले.



टाटा पॉवर कंपनीकडून पाताळगंगा नदीत सोडण्यात येणारे पाण्यात कमतरता झाली आहे. त्यामुळे पाणी पंपिग व साठवणूक होण्यास अडचणी निर्माण होत आहेत. कमी साठवणूक मुळे दोन वेळा पाणी पुरवठा करतांना अनेक भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने , नागरिकांना पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याचे चित्र निर्माण झाले होते. यावर उपाय म्हणून एकवेळ पण सर्वांना मुबलक पाणी पुरवठा होईल असे नियोजन अंतर्गत ११ मे पासून एक वेळ पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे खोपोली नगरपालिका उपनगराध्यक्ष व पाणीपुरवठा सभापती विक्रम साबळे यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

# मुरूडमधील मच्छीमार बांधवांची मान्सूनपूर्व तयारी झाली सुरू

**मुरुड : प्रतिनिधी**

हवामानखात्याकडून दरवर्षी खोलसमुद्रातील मासेमारी ३१ मे पासून बंद करण्याचे आदेश देते .परंतु ह्यावर्षी खराब हवामान असलयाने व मासळीचा दुष्काळ असल्याने मच्छिमार आपली बोट मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ४०० यांत्रिक बोटी किनाऱ्यावर ओढली .पुढील ३ महिने मासेमारी बंद असल्याने कोळी बांधव पाऊसपर्वीच्या तयारीला लागलेत .

पूर्वी कोळीबांधव एकत्र येऊन दोरीने बांधून बोटी किनाऱ्यावर ओढत असत ,परंतु आता मानवशक्ती कमी झाल्याने ती जागा मशीनने घेतली ट्रॅक्टर ला बांधून बोट किनाऱ्यावर ओढली जाते बोटी खाली मोठे लाकूड बांधून बोट किनारीवर स्थिर करण्यात येते .व बोटीच्या वरिलभागात लाकडी पट्टीचे छपरं बांधले जाते व नंतर प्लस्टिक बांधून पावसाळी सुरक्षण केले जाते



.बोटीला जाळी कडून समुद्राच्या पाण्यानी स्वच्छ धुऊन उन्हात सुकवून जाळी दुरुस्त करून घरात सुरक्षित ठेवले जातात

बोटीतील इंजिन ऑइल काढण्यात येते कारण पुढील ३ महिने बोट बंद असलयाने इंजिन खराब होऊनये म्हणून प्लस्टिकमध्ये बांधून सुरक्षित करण्यात येते .बोटीचा पंखा काढण्यात येतो .बोटीच्या खालील भागाला ऑइल लाऊन पाण्यापासून सुरक्षित करतात .छोट्या बोटी खाडीत मासेमारी करतात व पाऊस सुरू झाल्यावर मात्र कोळी बांधव किनाऱ्यावर रापण करून मासेमारी करून आपले पोट भारतात ,पावसाळी समुद्र किनारी लाटांसोबत चिकट फेस वाहून येतो तो खाण्यासाठी मासे किनारी येतात त्यावेळी प्रचंड लाटांमध्ये जाळी टाकून ८ते१० कोळीबांधव जाळी किनारी ओढतात ,जाळ्यात आलेल्या मासळी विकून आपली उपजीविका चालवतात रापणीची ही संस्कृती कोकणच्या किनाऱ्यावरून अस्तंगत होत आहे. त्याची जागा गिलनेट व पर्ससीननेट मच्छिमारी आदींनी घेतली.

# कशेळे ग्रामपंचायतीने लोकवर्गणीतून उभारली स्पर्धा परीक्षा अभ्यासिका

**नेरळ : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानांतर्गत तालुकास्तरीय मूल्यमापन समितीने कर्जत गटातील ग्रामपंचायतींच्या कामकाजाची पाहणी केली असता कशेळे ग्रामपंचायतीने विविध विकासकामे आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या जोरावर विशेष छाप पाडली. पंचायत समिती बागलाण, तालुका बागलाण, जिल्हा नाशिक येथील समितीने ८ मे २०२६ रोजी कशेळे ग्रामपंचायतीला भेट देत आर्थिक वर्षातील कामकाजाचे मूल्यमापन केले.


मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानामध्ये कर्जत गटातील एकूण ११ ग्रामपंचायती सहभागी झाल्या असून गाव विकासाच्या एक ते आठ घटकांवर आधारित विविध निकषांनुसार पाहणी करण्यात आली. यामध्ये शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच गावातील विविध सोयी–सुविधांचा आढावा घेण्यात आला.

कशेळे ग्रामपंचायतीने सर्व निकषांवर प्रभावी कामकाज केल्याचे पाहून तालुकास्तरीय समितीने ग्रामपंचायतीच्या प्रशासक उज्वला भोसले, ग्रामपंचायत अधिकारी सतीश चेंडके तसेच ग्रामस्थांचे विशेष कौतुक केले.

ग्रामपंचायतीने लोकवर्गणीतून तब्बल दोन लाख रुपयांचा निधी उभारून सुशिक्षित युवक आणि स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू केली आहे. विशेष म्हणजे या अभ्यासिकेसाठी लागणारी पुस्तकेही ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून खरेदी केली आहेत. तालुक्यात प्रथमच लोकसहभागातून असा उपक्रम राबविण्यात आला आहे

याशिवाय कोठीबे शाळेमध्ये इयत्ता सातवी ते आठवीत शिकणाऱ्या मुलींसाठी उभारण्यात आलेल्या 'पिंक रूम' उपक्रमाचेही समितीने कौतुक केले. मासिक पाळीच्या काळात विद्यार्थिनींना आराम करता यावा यासाठी ही विशेष व्यवस्था करण्यात आली असून त्या ठिकाणी पुस्तके, आरोग्यविषयक माहिती तसेच विविध व्यायाम प्रकारांबाबत जनजागृती करणारे फलक लावण्यात आले आहेत.

"तालुक्यातील हा सर्वोत्तम प्रयोग असून इतर ग्रामपंचायतींनीही असा उपक्रम राबविल्यास मुलींचे शाळेतील प्रमाण वाढण्यास मोठी मदत होईल," असे मत गटविकास अधिकारी अतुल पाटील यांनी व्यक्त केले.



# पालीतील गुणवंतांचा एसएससीत झेंडा

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या एसएससी परीक्षा निकालात पालीतील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. विविध शाळांमधून गुणवंत विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह यश मिळवत शाळांचा लौकिक उंचावला आहे.

एस. ई. एस. टॉपवर्ध इंग्लिश मीडियम स्कूल पालीमधील शेख उहाना परवीन युनूस अलीने ९२.४० टक्के गुण मिळवत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. द्वितीय क्रमांक जी. बी. वडेर हायस्कूल पालीमधील मोबारकर प्रियल परेशने ९२.२० टक्के गुणांसह पटकावला, तर श्री राज एज्युकेशनल सेंटर घोटावडेमधील समार्थ देशमुखने ९१.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला आहे.

विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांवर परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# गुजरातची राजस्थानवर एकतर्फी मात



**जयपूर : वृत्तसंस्था**

शुबमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात टायटन्सने शनिवारी जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर यजमान राजस्थान रॉयल्सचा ७७ धावांनी धुव्वा उडवला. या मोठ्या विजयासह गुजरातने गुणतालिकेत १४ गुणांसह दुसऱ्या स्थानी झेप घेतली आहे. दुसरीकडे, राजस्थानचा युवा कर्णधार यशस्वी जैस्वालला मात्र आपल्या नेतृत्वाखालील पहिल्याच पराभवाचा सामना करावा लागला.

प्रथम फलंदाजीचे निमंत्रण मिळाल्यानंतर गुजरात टायटन्सने आक्रमक सुरुवात केली. सलामीवीर शुभमन गिलने अवघ्या ४४ चेंडूंत नऊ चौकार व तीन षटकारांच्या मदतीने ८४, तर साई सुदर्शनने ३६ चेंडूंत ५५ धावांचे योगदान दिले. अखेरच्या षटकांत वॉशिंग्टन सुंदर आणि राहुल तेवतिया यांनी फटकेबाजी करत गुजरातला २० षटकांत ४ बाद २२९ धावांचा डोंगर उभा करून दिला.

२३० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सचा संघ गडबडला. युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीने १६ चेंडूंत ३६ धावांचा फ्लाईंग स्टार्ट दिला, तर अनुभवी रवींद्र जडेजाने ३८ धावा जोडल्या, मात्र ठरावीक अंतराने विकेट पडत गेल्याने राजस्थानला विजयापासून कित्येक कोस दूरच राहावे लागले.

फिरकीपटू राशीद खानने सर्वाधिक चार बळी घेत राजस्थानचे कंबरडे मोडले. त्याला जेसॉन होल्डर (तीन बळी) आणि कागिसो रबाडा (दोन बळी) यांनी मोलाची साथ दिली. अखेर राजस्थानचा डाव १६.३ षटकांत १५२ धावांवर आटोपला आणि गुजरातने ७७ धावांनी एकतर्फी विजय साकारला.

आयपीएलच्या इतिहासातील सर्वात मोठ्या विजयासह गुजरातच्या संघाने गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे, तर या पराभवामुळे राजस्थान रॉयल्सच्या संघासाठी प्ले ऑफची शर्यत आव्हानात्मक झाली आहे. ११ सामन्यानंतर त्यांच्या खात्यात सहा विजयासह १२ गुण जमा असून ते पाचव्या स्थानावर आहेत. आता उर्वरित तीनपैकी किमान दोन सामने त्यांना जिंकावेच लागतील.

# टी-२०मध्ये वैभव सूर्यवंशीचे षटकारांचे शतक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतातील युवा क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी सातत्याने विक्रमांना गवसणी घालत आहे. आयपीएल २०२६मध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळणाऱ्या या १५ वर्षीय फलंदाजाने शनिवारी अनोख्या जागतिक विक्रमाची नोंद केली. गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात वैभवने मोहम्मद सिराजच्या पहिल्याच चेंडूवर शानदार षटकार ठोकला. यासह त्याने टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात कमी चेंडूत १०० षटकार पूर्ण करण्याचा जागतिक विक्रम नावावर केला.

वैभवने हा टप्पा अवघ्या ५१४ चेंडूत गाठला, जो आतापर्यंत कोणत्याही फलंदाजासाठीचा सर्वात वेगवान आकडा आहे. या एका षटकारासह त्याने किरॉन पोलार्डला मागे टाकले. एवढेच नाही तर २० वर्षांपेक्षा कमी वयात



## सर्वांत कमी चेंडूंत नवा विक्रम

टी-२० क्रिकेटमध्ये १०० षटकार मारणारा तो पहिलाच फलंदाज ठरला आहे.

टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात कमी चेंडूत १०० षटकार मारण्याचा विक्रम याआधी किरॉन पोलार्डच्या नावे होता. वेस्ट इंडिजच्या धाकड फलंदाजाने टी-२० कारकिर्दीत ८४३ चेंडूंचा सामना केला होता. वैभव सूर्यवंशी याने फक्त ५१४ चेंडूत षटकारांचे शतक साजरे केले.

## पॉवर प्लेचा नवा 'सिक्सर किंग'

गुजरात टायटन्सविरुद्ध वैभवने अवघ्या १६ चेंडूत ३६ धावा केल्या. त्याच्या खेळीत तीन षटकार आणि तीन चौकारांचा समावेश होता. विशेष म्हणजे त्याचे तिन्ही षटकार पॉवर प्लेमध्ये आले. यासह वैभव आता आयपीएलच्या एका मोसमात पॉवर प्ले ओव्हर्समध्ये सर्वाधिक षटकार ठोकणारा फलंदाज बनला आहे.

वैभव ज्या पद्धतीने एकामागून एक विक्रम रचत आहे, त्यावरून हे स्पष्ट झाले आहे की भारतीय क्रिकेटला एक नवा सुपरस्टार मिळाला आहे. अवघ्या १५व्या वर्षी त्याचा आत्मविश्वास, पॉवर हिटिंग आणि मोठ्या व्यासपीठावरील कामगिरी सर्वांनाच चकित करीत आहे.

# सलग सातव्या आयपीएल हंगामात गिलच्या चारशेपेक्षा अधिक धावा

## कोहली, डिव्हिलियर्स, वॉर्नरला टाकले मागे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गुजरात टायटन्सचा कर्णधार शुबमन गिल याने राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या सामन्यात दमदार खेळी केली. या सामन्यात तो आयपीएलमध्ये आपल्या खात्यात आणखी एक शतकी खेळीची नोंद करेल, असे वाटत असताना एक अतरंगी फटका खेळताना ८४ धावांवर झेलबाद झाला. त्याचे शतक हुकले, पण या खेळीसह त्याने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.

जयपूर येथील सवाई मानसिंग स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात गिलने यंदाच्या हंगामात ४०० धावांचा पल्लाही गाठला. या कामगिरीसह त्याने विराट कोहली या दिग्गजाला मागे टाकत नवा



विक्रम प्रस्थापित केला. २०२०पासून प्रत्येक हंगामात गिलने ४००पेक्षा अधिक धावा केल्या आहेत. सलग सात हंगामात ४००पेक्षा अधिक धावा करताना त्याने एबी डिव्हिलियर्स आणि डेविड वॉर्नर यांचा विक्रम मोडीत काढला. या दोन दिग्गजांनी सलग सहा हंगामात ४०० किंवा त्यापेक्षा अधिक धावा केल्याचा रेकॉर्ड आहे.

आयपीएलमध्ये गिलच्या आधी आयपीएल स्पेशलिस्ट सुरेश रैना याने २००८ ते २०११ हंगामात सलग सात हंगामात ४०० किंवा त्यापेक्षा अधिक धावा करण्याचा पराक्रम केला आहे. याशिवाय शिखर धवन याने २०१६ ते २०२२ या कालावधीत ही कामगिरी करून दाखवली आहे. एकंदरीत विचार केला. तर आयपीएलमधील १८ हंगामात विराट कोहलीने ११ वेळा ४०० किंवा त्यापेक्षा अधिक धावा केल्याचा रेकॉर्ड आहे.

दरम्यान, राजस्थानविरुद्धच्या सामन्यात शुबमन गिलने साई सुदर्शनच्या साथीने पहिल्या विकेटसाठी ११८ धावांची भागीदारी केली. साईसोबत सहाव्यांदा पहिल्या विकेटसाठी शतकी भागीदारी रचताना त्याने विराट कोहली आणि फाफ ड्युप्लेसी जोडीचा विक्रम मोडला. या दोघांनी आरसीबीसाठी पाच शतके झळकवल्याचा रेकॉर्ड आहे.

# ...म्हणून सीएसकेचे नेतृत्व करीत नाही -संजू सॅमसन

**चेन्नई : वृत्तसंस्था**

यंदाच्या आयपीएल हंगामापूर्वी टी-२० विश्वचषकात 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट'चा बहुमान मिळालेल्या संजू सॅमसनला चेन्नई सुपर किंग्समध्ये महेंद्रसिंह धोनीचा वारसदार म्हणून पाहिले जात होते. फॉर्म कायम ठेवत त्याने आयपीएलमध्येही लक्षवेधी कामगिरी केली आहे तसेच सीएसकेची प्लेऑफमधील स्थानासाठीची दावेदारी भक्कम झाली आहे. दरम्यान, या हंगामात आपण संघाचे नेतृत्व का करत नाही आहोत याचे कारण त्याने स्पष्ट केले आहे.

चेन्नई संघात आगमन झाल्यापासून संजू सॅमसन ऋतुराज गायकवाडच्या जागी नेतृत्व स्वीकारणार का? अशा चर्चांना उधाण आले होते. अवघ्या १३ धावांनी त्याचे या मोसमातील



### संघात घेण्यासाठी ऋतुराजचाच पुढाकार!

संजूने यावेळी सध्याचा कर्णधार ऋतुराज गायकवाडला पूर्ण पाठिंबा दिला. ऋतुराजच्या शांत स्वभावाचे आणि नेतृत्वाचे कौतुक करताना त्याने एक गुपितही उघड केले. राजस्थानमधून चेन्नईत येण्यासाठी खुद्द ऋतुराजनेच पुढाकार घेतला होता, असे संजूने सांगितले. ऋतुराजने चेन्नई संघाचे एक वर्ष नेतृत्व केले आहे, तर मी पाच वर्षे दुसऱ्या संघाचे नेतृत्व केले आहे. तरीही त्याने स्वतःहून मला त्याच्या संघात खेळण्यासाठी आमंत्रित केले.

तिसरे शतक हुकले, मात्र आता ३१ वर्षीय संजूने यावर मौन सोडले असून या मोसमात तो कर्णधार का नाही याचे कारण स्पष्ट केले आहे.

'सुपर किंग्स' पॉडकास्टमध्ये बोलताना संजू म्हणाला की, नवीन संघात दाखल झाल्यावर कर्णधारपदाचा विचार कधीच माझ्या मनाला आला नाही. माझ्याकडे आधीच एक संघ होता आणि तिथे माझे एक स्थान होते. मला तिथून बाहेर पडून दुसऱ्या संघात सहभागी व्हायचे होते. अशा परिस्थितीत जेव्हा तुम्ही एका संघातून दुसऱ्या संघात जाता, तेव्हा तुम्ही अटी किंवा मागण्या घालू शकत नाही. तुम्ही एका नवीन घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न करत असता. जेव्हा तुम्ही नवीन घरात जाता, तेव्हा तिथे मागण्या घेऊन जायचे नसते, हेच मी शिकलो आहे.

मूळचा केरळचा असलेल्या संजूने सांगितले की, त्याच्या मल्याळी मूल्यांनी कोणत्याही अपेक्षेविना संघासाठी सर्वोत्तम देण्याची शिकवण दिली आहे. तुम्ही तिथे जाता, स्वतःला सिद्ध करता आणि आपल्या क्षमतेनुसार सर्वोत्तम कामगिरी करता. चेन्नई आणि दुबईमध्ये अनेक मल्याळी लोक काम करतात. लोक मल्याळी माणसाला कामावर ठेवतात, कारण तो विश्वासाची परतफेड करण्यासाठी आपला जीव ओततो. सीएसकेने माझ्यावर विश्वास दाखवला आणि मला आमंत्रित केले, आता मी या संघासाठी सर्वस्व अर्पण करायला तयार आहे, असे त्याने पुढे नमूद केले.

# कसे आहे आयपीएल प्लेऑफचे समीकरण?

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६च्या प्लेऑफची शर्यत रंगतदार झाली आहे. प्रत्येक सामन्यानुसार प्लेऑफचे गणित बदलताना दिसत आहे. साखळी फेरीअखेर गुणतालिकेतील अव्वल चार संघ प्लेऑफसाठी पात्र ठरणार आहेत. १४ सामने पूर्ण झाल्यानंतर दोन संघांचे गुण समान असतील, तर नेट रनरेटच्या आधारे क्रमवारी ठरवली जाईल.

४८ सामन्यांनंतर आयपीएल २०१६चे विजेते सनरायझर्स हैदराबाद, पंजाब किंग्ज, गतविजेते रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि राजस्थान रॉयल्स हे संघ गुणतालिकेतील पहिल्या चार स्थानांवर आहेत, मात्र अद्याप कोणत्याही संघाने अधिकृतपणे प्लेऑफमधील स्थान निश्चित केलेले नाही. दुसरीकडे लखनऊ सुपर जायंट्सची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. दहा सामन्यांत केवळ दोन विजयांसह हा संघ गुणतालिकेच्या तळाशी असून प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडणारा पहिला संघ ठरण्याचा धोका त्यांच्यावर आहे.

सनरायझर्स हैदराबाद संघाचे १४ गुण असून त्यांना प्लेऑफ गाठण्यासाठी एक सामना जिंकण्याची गरज आहे. पंजाब किंग्स संघ १३ गुणांवर असून त्यांना चारपैकी दोन सामने जिंकायचे आहेत, तर आरसीबी व राजस्थान या संघांचे १२ समान गुण आहेत. या दोघांनाही उर्वरित चार सामन्यांपैकी दोन सामने जिंकावे लागतील.



उर्वरित सहा संघांपैकी गुजरात टायटन्सचा संघ १० सामन्यांनंतर १२ गुणांसह पाचव्या स्थानी आहे. संघाला प्लेऑफ गाठण्यासाठी चारपैकी दोन सामने सामने जिंकावे लागतील. चेन्नई सुपर किंग्सचा संघ १० सामन्यांनंतर १० गुणांवर आहे. आता संघाला प्लेऑफ गाठण्यासाठी चारपैकी तीन सामने जिंकायचे आहेत. कोलकाता नाईट रायडर्सने सलग चार सामने जिंकले आहेत, त्यामुळे संघ नऊ गुणांसह सातव्या स्थानी आहे. यासह संघाला चारपैकी चार सामने संघाला जिंकायचे आहेत.

दिल्ली कॅपिटल्सने प्लेऑफच्या शर्यतीत कायम असून ११ सामन्यांनंतर संघाचे आठ गुण आहेत. आता संघाला प्लेऑफ गाठण्यासाठी उर्वरित तीन सामने मोठ्या फरकाने जिंकायचे आहेत, पण इतर संघांचे निकालही त्यांच्या बाजूने लागावे लागतील.

मुंबई इंडियन्सचा संघ १० सामन्यांमध्ये सहा गुणांसह नवव्या स्थानी आहे. संघाला आता उर्वरित चारही सामने मोठ्या फरकाने जिंकायचे आहेत. संघाने एकही सामना गमावल्यास त्यांना स्पर्धेबाहेर होण्याचा धोका आहे. लखनऊ सुपर जायंट्सचा संघ सहा गुणांवर असून त्यांना चारही सामने जिंकायचे आहेत. एक चूकही त्यांना महागात पडू शकते.

# 'मदर्स डे'निमित्त वैभव सूर्यवंशीची भावूक पोस्ट व्हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमधील राजस्थान रॉयल्सचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीने 'मदर्स डे' (मातृदिन) निमित्त आपल्या आईसाठी केलेली एक खास पोस्ट सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यापूर्वी वैभवने इन्स्टाग्रामवर आपल्या आईला मानवंदना दिली.

राजस्थान रॉयल्सच्या 'पिंक प्रॉमिस' या उपक्रमाचा भाग म्हणून वैभवने ही पोस्ट शेअर केली आहे. ग्रामीण राजस्थानमधील महिलांचे सक्षमीकरण आणि शाश्वत विकासाला पाठिंबा देण्यासाठी राजस्थान रॉयल्सने या सामन्यात खास 'ऑल-पिंक' (पूर्णतः गुलाबी) जर्सी परिधान केली होती. वैभवने आपल्या पोस्टला हे तुझ्यासाठी आई, असे कॅप्शन दिले आहे.

**पिंक प्रॉमिस मोठी चळवळ**



या उपक्रमाबद्दल बोलताना राजस्थान रॉयल्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आलोक चित्रे म्हणाले, पिंक प्रॉमिस ही आता एक मोठी चळवळ बनली आहे. २०२४मध्ये या उपक्रमाद्वारे २६० घरांना, तर २०२५मध्ये ५२०हून अधिक घरांना सौर ऊर्जेची मदत मिळाली. यंदाही महिलांच्या नेतृत्वाखालील सामाजिक परिवर्तनासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

# बटलरला बाद केल्यानंतर जडेजाचे पॉकेट सेलिब्रेशन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यातील सामन्यात राजस्थानचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाने गुजरातचा फलंदाज जोस बटलरची विकेट घेतली. यानंतर जड्डूने केलेल्या सेलिब्रेशनने लक्ष वेधले आहे.

गुजरात संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला. साई सुदर्शन व शुबमन गिलने संघाला दणक्यात सुरुवात करून दिली. दोघांनीही अर्धशतक झळकावत पहिल्या विकेटसाठी ६५ चेंडूत ११८ धावांची भागीदारी रचली. यश राजा पुंजाच्या गोलंदाजीवर



साई झेलबाद झाला. यानंतर जोस बटलर फलंदाजीला आला.

बटलरसमोर १३वे षटक टाकण्याची जबाबदारी वरिष्ठ फिरकीपटू रवींद्र जडेजाला देण्यात आली. जडेजाच्या जादुई फिरकी चेंडूवर बटलर मोठा फटका खेळायला गेला आणि चेंडू हवेत उंच उडाल्याने झेलबाद झाला. डोनावन फरेराने झेल टिपल्यानंतर जडेजाने भन्नाट सेलिब्रेशन केले.

जडेजाने जोस बटलरकडे दोन्ही हाताने खुणावले आणि त्यानंतर खिशावर हात मारत त्याला खिशात ठेवल्याची ॲक्शन केली. जडेजाने या सेलिब्रेशनमध्ये त्याने बटलरकडे बोट दाखवत तुला मी खिशात ठेवतो, असे सांगताना दिसला. याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

# युझवेंद्र चहलला तुरुंगात टाका!

## व्हायरल 'वेप' व्हिडीओवर माजी क्रिकेटपटू भडकला

**मुंबई : प्रतिनिधी**

एकीकडे आयपीएलमधील सामन्यांमधील चुरस वाढत असताना पंजाब किंग्सचा फिरकीपटू युझवेंद्र चहल वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका व्हिडीओमध्ये चहल विमानातील प्रवासादरम्यान कथितपणे 'वेपिंग' (ई-सिगारेट ओढताना) करताना दिसत आहे. या घटनेवर भारताचे माजी फिरकीपटू लक्ष्मण शिवरामकृष्णन यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली असून आरोप खरे ठरल्यास कठोर शिक्षेची मागणी केली आहे.

या व्हिडीओमध्ये चहल त्याचा सहकारी शशांक सिंगसोबत बसलेला असून तो आपले कृत्य



लपवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. अर्शदीप सिंगने शेअर केलेल्या पॉडकास्ट व्हिडीओमधून ही क्लिप घेण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे, मात्र या व्हिडीओची सत्यता आणि चहल खरोखरच ई-सिगारेट वापरत होता का याची पुष्टी झालेली नाही.

सोशल मीडियावरील एका पोस्टला उत्तर देताना शिवरामकृष्णन यांनी निदर्शनास आणून दिले की, भारतात 'वेपिंग' उत्पादनांवर बंदी आहे. त्यांनी सध्याच्या दंडात्मक कारवाईच्या परिणामकारकतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.तसेचत्याला तुरुंगात टाकायला हवे व २५ टक्के मॅच फी म्हणजे खूपच कमी दंड आहे, असे नमूद केले आहे.

शिवरामकृष्णन यांनी प्रतिक्रियेत रियान परागला मिळालेल्या शिक्षेचाही संदर्भ दिला. या स्पर्धेच्या सुरुवातीला राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान पराग पंजाब किंग्सविरुद्धच्या सामन्यादरम्यान ड्रेसिंग रूममध्ये वेपिंग करताना आढळला होता. त्यानंतर त्याच्यावर मॅच फीच्या २५ टक्के दंड ठोठावण्यात आला होता याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com